# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०८/०३/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ०८/०३/२००७ रोजी सभा सुचना क्र. ३१ दि. ०३/०३/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| २) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ३) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |

**मा. सभापती सो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करुन सभेला सुरुवात करावी अशी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०१ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

साहेब, कदाचित, तुम्ही हे इतिवृत्त मंजुरीला देतेवेळी गडबडीत असाल. परंतु, या ठिकाणी सगळे अधिकारी हजर आहेत. तुम्ही या इतिवृत्तांतामध्ये जे काही लिहिलेले आहे. आम्ही त्याला मंजूरी दिलेली आहे. त्याची काय कामे झालेली आहेत? त्याचे उत्तर कोणी देईल का? कारण या इतिवृत्तांतामध्ये तीन-चार मुद्दे आहेत. जे मुद्दे कोणीही उपस्थित केलेले नाहीत. सगळ्यांनी याच्यावर आग्रह धरलेला होता. मा. सभापतीसाहेब, मी इतिवृत्तांला मंजूरी देतो. परंतु, असे होता कामा नये की ही स्थायी समिती काहीतरी चर्चा करते आणि चर्चा झाली की विषय संपला. आमची अशी अपेक्षा आहे किंवा आमचे असे कर्तव्य आहे की या स्थायी समितीच्या चर्चेत इतिवृत्तांत मंजूरीला येते त्याची कार्यवाही झालेली आहे की नाही. मी पहिल्यांदा या बांधकाम खात्याला विचारतो की, मी मा. आयुक्तसाहेबांना विनंती केलेली होती की भाईंदर (प.)ची चौपाटी रेल्वेच्या ताब्यात घ्यावी. आम्ही तिथे काहीही करू देणार नाही. त्यांनी एका कार्यक्रमाला विरोध केलेला होता. त्यावेळेला आपण रेल्वेला पत्र लिहायचे असे इतिवृत्तांतामध्ये लिहिलेले आहे. तुम्ही पत्र लिहिलेले होते का? जर तुम्ही पत्र लिहिलेले असेल तर आम्हाला पुन्हा कोणी काहीही म्हणत नाही. जर तुम्ही रेल्वेला पत्र लिहिले असेल तर तुम्ही पत्र लिहिलेले आहे असे सांगा. जर तुम्ही रेल्वेला पत्र लिहिले नसेल तर नाही सांगा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही काय आहे? ते समजून घ्या.

**मा. सभापती सो. :-**

मी 'जागतिक महिला दिना' निमित्त सर्व महिलांना 'जागतिक महिला दिना' च्या हार्दिक शुभेच्छा देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी सर्व महिलांचे 'जागतिक महिला दिन' निमित्त हार्दिक अभिनंदन करतो.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

मा. सभापतीसाहेब, आज 'जागतिक महिला दिन' आहे. या 'जागतिक महिला दिना' च्या निमित्ताने आपल्या कार्पोरेशनने काही कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. परंतु, सभा सुरू होण्यापूर्वी आपण 'जागतिक महिला दिना' च्या निमित्ताने महापालिकेच्या कार्यालयामध्ये ज्या महिला नगरसेविका आहेत. मी त्या सगळ्यांना प्रशासनामार्फत हार्दिक शुभेच्छा देतो. या 'जागतिक महिला दिना' च्या निमित्ताने मिरा भाईंदर शहरामध्ये महिलांची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी जे-जे कार्यक्रम आपल्याकडून सुचित होतील. आपण त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करु आणि संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये या दिनाचे औचित्य साधून एक वेगळ्या प्रकारचा सांस्कृतिक कार्यक्रम किंवा कोणतेही अन्य कार्यक्रम असे व्हावेत की जेणेकरुन महिलांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी आणि महिलांच्या ज्या काही जबाबदाऱ्या असतील त्या जबाबदाऱ्यांची जाणीव प्रत्येक महिलेला करुन द्यावी अशाप्रकारे आपण एखादा कार्यक्रम आयोजित करावा. आपल्याला त्याच्यासाठी प्रशासनाकडून संपूर्ण सहकार्य मिळेल आणि असे कार्यक्रम राबवण्यामध्ये प्रशासनसुद्धा पुढाकार घेईल. मी पुन्हा एकदा या महिला दिनानिमित्त शुभेच्छा देतो. आपल्या संबंध आयुष्यामध्ये महिलांची भरभराट व उन्नती होवो. त्यांचे जे हक्क आहेत ते त्यांना पुरुषाप्रमाणे मिळावेत अशी मी शुभेच्छा व्यक्त करतो.

**जयंत पाटील :-**

स्थायी समितीच्या नगरसेविकांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. खरे म्हणजे आपल्या शहरात चांगल्या दृष्टिने महिला दिन साजरा होत आहे. आपल्या महापौर महिला आहेत. सध्या महिलांचे राज्य आहे. आपल्या महापालिकेत महिलांवर अन्याय झालेला नाही. आमच्या राष्ट्रिय अध्यक्षा श्रीम. सानिया गांधी महिला आहेत. आपण सर्व दृष्टीने महिलांना प्राधान्य दिलेले आहे असा याचा अर्थ होतो. आपल्याला भविष्यात महापौर पद मिळत जावे. आमचे आरक्षण ओपन आहे. आम्ही सर्वांना शुभेच्छा देतो आणि तुम्ही महिलांसाठी जास्तीत जास्त कार्य करा. या परिसरातील ज्या गरिब महिला आहेत. दारिद्रयरेषेखालील महिला आहेत. तुम्ही त्यांच्यासाठी कार्य करावे अशी मी इच्छा व्यक्त करतो आणि शुभेच्छा देतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

धन्यवाद.

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, आज मार्च महिना आहे. म्हणजेच आज 'जागतिक महिला दिन' म्हणून सर्वत्र साजरा होत आहे. आपल्या महापालिकेत त्या पध्दतीने महिलांच्याबाबतीत तसे कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. तसेच, महापालिका क्षेत्रामध्ये विविध पक्षाच्या महिलांनी या महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळवलेले आहे. आपण महिलांचा सत्कार सोहळा आयोजित केलेला आहे. आज ज्या महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळालेले आहे. आम्ही त्या सर्वांचे स्वागत केलेले आहे. यापुढेसुद्धा आपल्या मिरा भाईंदर शहरातील ज्या महिला आहेत. त्या महिला दारिद्रयरेषेखाली किंवा परिस्थितीने रंजल्या गांजल्या असतील तर आपण त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून एक चांगला दिलासा द्या. त्यांनासुद्धा आपल्याबरोबर आणण्याचा आणि आपल्या प्रवाहात सामील करण्याचा प्रयत्न करा. आज महिला दिनाच्या निमित्ताने मी सर्व महिला भगिनींना हार्दिक शुभेच्छा देतो.

**रोहिदास पाटील :-**

आज 'जागतिक महिला दिन' आहे. त्यामुळे साधारणतः सगळ्यांची अशी भावना असते की आपल्याकडून महिलांवर कोणताही अन्याय होऊ नये. महिला दिन हा अन्यायासाठी नसून महिला जरी बोलत असल्या तरी अन्याय होतो. राष्ट्राच्या सर्व कामकाजामध्ये उभारणीमध्ये महिलांना नीटनेटका सहभाग मिळावा हे औचित्य साधून महिला दिन साजरा करावा. म्हणजे शैक्षणिक क्रांती असू दे की आरोग्याच्याबाबतीत असू दे, सज्ञानाची असू दे, संस्कृतीची असू दे, आचारविचारांची असू दे यासाठी हा महिला दिन घोषित केलेला आहे. सरकार किंवा आपली महापालिका किंवा अन्य संस्था म्हणजे जिल्हापरिषद असू दे, ग्रामपंचायत असू दे त्या सर्व स्तरावर कार्यक्रम होत असतात. उद्देश असा असतो की कधी-कधी दुर्लक्ष होत असले तरी सर्व लोकांनी कार्यक्रमात सहभागी होऊन आपण समाजाच्या प्रगतीसाठी काम करतो, महिलांची प्रगती ही समाजाची प्रगती आहे असे निश्चित झालेले आहे. प्रथम महिलांची प्रगती होईल. महिला समाधानी होतील. आपल्या मिरा भाईंदरमधील सर्व महिला समाधानी आहेत असे मला वाटते. त्यांच्यावर कुठेही अन्याय होत आहे असे मला वाटत नाही किंवा त्यांची काही मागणी आहे असे मला वाटत नाही. त्याच्यासाठी या सभागृहात कामकाज करतेवेळी आपण सगळ्यांचा मान ठेवलेला आहे. सगळ्यांना प्राधान्य दिलेले आहे. त्याच्या पलिकडे जाऊन म्हटले तर कदाचित एखादी महिला चुकून बोलली असली तरीसुध्दा आम्ही पुरुषप्रधान लोकांनी ते सहन करुन घेतलेले आहे असे आमचे अनुभव आहेत. मी अपेक्षा करतो की यापुढे सर्व महिला असे कधीही समजणार नाहीत की आम्हाला न्याय मिळत नाही. आम्हाला न्याय मिळतो. अपेक्षेपेक्षा जास्त न्याय मिळतो असे समजून बंधूप्रेम वाढवतील अशी अपेक्षा ठेवतो. आपल्याकडे सभागृहातील कामकाजाचे असे उदाहरण नाही की आपण कोणत्या महिलेला अपमानित केलेले आहे. त्यामुळे मी आजच्या ह्या दिवशी अशी अपेक्षा करतो की सर्व

महिलांनी हा आजचा दिवस न समजता ३६५ दिवस हे महिला दिनाचे आहेत. आपण त्या पध्दतीने ही जबाबदारी ओळखून आपापले कर्तव्य बजावावे. धन्यवाद.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, प्रशासनाच्या एक निदर्शनास आणू इच्छितो की, आपण महापालिकेत प्रवेश करतो तिथे एक मेटल-डिटेक्टर लावलेले आहे. त्याच्यानंतर स्थायी समितीच्या सभागृहात येताना एक जुने मेटल-डिटेक्टर लावलेले आहे. आम्हाला त्याचा उद्देश समजलेला नाही. ते का लावले गेले? त्याचे चेकिंग कोण करतो? त्याच्यामुळे आतापर्यंत किती लोकांच्या खिशामध्ये रिव्हॉल्व्हर पकडले गेले? कुठे चाकू, हत्यारे पकडली गेली का? ह्याच्यामुळे हे भरपूर अडचणीचे झालेले आहे. ही मागणी कोणी केली? आतापर्यंत किती आरोपी पकडले गेले? या गोष्टी येणा-या-जाणा-यासाठी अडचणीच्या होतात. त्याच्यामुळे आपल्या शहरामध्ये एक वेगळा मॅसेज जातो. महापालिकेत येणारे सगळे गुंड असावेत का? ते काय घेऊन येतात का?

**ज्युडी डिसोझा :-**

आपल्याकडे चेकिंग करायला कोणी नाही का?

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे चेकिंग करायला कोणीही नाही. आतापर्यंत आमच्या पंधरा वर्षाच्या आयुष्यात आम्हाला असे कधीही आढळले नाही. कधी काहीही घडलेले नाही. परंतु, आता भरपूर अडचणीचे होत आहे. मेन दरवाज्यावर मेटल-डिटेक्टर लावल्यामुळे दरवाजा एकदम चिंचोळा झालेला आहे. आम्ही त्याच्यामधून प्रवेश करतो. आम्हाला स्वतःला असे फिल होते की, आमच्या खिशामध्ये काही आहे का? आम्ही येताना आमच्या खिशाला मुद्दाम हात लावतो की, चुकुन काही आलेले आहे का? नक्की त्याच्यामध्ये काय धोरण आहे? ती कोणी मागणी केलेली होती? आपण मेटल-डिटेक्टर लावायला परवानगी दिलेली आहे का?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. मी त्या संदर्भात थोडक्यात खुलासा करु इच्छितो की, मिरा रोड आणि भाईंदर रेल्वे स्थानकाच्या मध्ये रेल्वेमध्ये जेव्हा बॉम्बस्फोट झाला तो बॉम्बस्फोट झाल्यानंतर आपल्या महासभेमध्ये याबाबत चर्चा उपस्थित झालेली होती. त्यावेळेला ब-याच सदस्यांनी सांगितले होते की आपल्या कार्यालयामध्ये अशाप्रकारची एखादी यंत्रणा ठेवावी. आतापर्यंत तशी गरज वाटली नाही किंवा एखाद्या अज्ञात व्यक्तीकडून अशाप्रकारचे बॉम्बस्फोट झाले. ते बॉम्बस्फोट झाल्यानंतर आपल्याला मेटल-डिटेक्टर लावण्याची गरज वाटली. आपले कार्यालय हे नेहमी बजबजलेले कार्यालय असते. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत नागरिकांची सतत ये-जा असते. त्या दृष्टीने महापालिकेने जे काही निर्णय घेतले. आपण त्या निर्णयाची अंमलबाजावणी केलेली आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी मेटल-डिटेक्टर ठेवण्यात आलेले आहे. आता या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत किंवा स्थायी समितीच्या सभागृहासमोर मेटल-डिटेक्टर लावलेली आहे. खरे म्हणजे तिथे तसे मेटल-डिटेक्टर लावण्याची गरज नव्हती असे मला वाटते. तरीसुध्दा मी त्या संदर्भात माहिती घेतो आणि सभागृहाला सांगतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही बॉम्बस्फोटबाबत बोलतात. ते मला मान्य आहे. परंतु, त्याचे चेकिंग करायला कोण आहे? म्हणजे ती लोक बॉम्ब घेऊन आरामात आतमध्ये येतील हे तुम्हाला माहिती आहे. परंतु, त्याचे चेकिंग करायला कोणतरी पाहिजे.

**मा. सभापती :-**

दुसरी गोष्ट अशी आहे की, आपल्या मागच्या दरवाजाच्या जी कॅन्टीन आहे. तो दरवाजा खुला आहे. तुम्ही तो बंद केलेला आहे. मागुन जे प्रवेशद्वार आहे. तिथे काहीही माहिती पडत नाही. उगाच शोसाठी लावलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, तिथे चेकींग करणारे कोणीही नाहीत.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

आपण चेकींगसाठी कायमस्वरुपी सेक्युरिटी गार्डस तैनात करुया.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांनी जो प्रश्न विचारलेला होता. तो प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आपल्याकडे अनेक मागचे दरवाजे आहेत आणि त्याच्यामध्ये आउट-हाऊस आहेत. मुख्य दरवाज्यामधून आल्यानंतर स्थायी समितीला पुन्हा मेटल-डिटेक्टर लावण्याची काय गरज आहे?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

तुम्हाला स्थायी समितीला मेटल-डिटेक्टर लावण्याची आवश्यकता नाही.

**एस. ए. खान :-**

तुम्ही महापौरांच्या केबीनला मेटल-डिटेक्टर लावा.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

मा. सभापतीसाहेबांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत की, आपल्या महापालिकेची जी एन्ट्री आहे त्या ठिकाणी मेटल-डिटेक्टर ठेवून बाकीच्या ज्या एन्ट्री आहेत किंवा कार्यालयाच्या एन्ट्री बंद करण्यात येतील.

**रोहिदास पाटील :-**

मेन दरवाज्यावर मेटल-डिटेक्टर लावलेले आहे ते बरोबर आहे. त्याला महापालिकेने मंजुरी दिलेली होती. तेसुध्दा बरोबर आहे. आपण तत्परतेने मेटल-डिटेक्टर लावले हे भुषणावह आहे. परंतु, आपण मेटल-डिटेक्टर लावल्यानंतर ते शो-पीससारखे लावले ती चिंतेची बाब आहे. तिथे जेवढी माणसे येतात तेव्हा ते तपासण्यासाठी कोण आहे? समजा, जर कोणी आल्यानंतर ते मेटल-डिटेक्टर वाजत राहिले तर अडवणारे आणि तपासणारे कोणीही नाही. तिथे तपासणीस असेल तर वेगळी गोष्ट आहे की त्याचा उपयोग व्हायला पाहिजे. त्याचा उपयोग होत नाही आणि शोभेचे आहे असे उगीच दिसते. त्याच्यावर टिका-टिपणी होते. तुम्ही त्या क्षमतेचे अधिकारी नियुक्त करा. जो येईल त्याच्या वेळेला तसेच वाजले तर तुम्ही तपास करु शकता.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

तुम्ही उद्या तशाप्रकारचा एक अधिकारी नियुक्त करा.

**जयंत पाटील :-**

उद्या तुम्ही असताना एखादी घटना घडली तर त्याला तो अधिकारी जबाबदार रहायला पाहिजे. त्या अधिका-याने चेकींग न केल्याने कोणी काहीही घेऊन आला तर तो अधिकारी जबाबदार रहायला पाहिजे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

त्या ठिकाणी जो कोणी सुरक्षा रक्षक असेल त्या सुरक्षा रक्षकास सगळ्यांनी सहकार्य केले पाहिजे. याच्यामध्ये कोणालाही असे वाटू नये की मला वेगळे काढले किंवा मला थांबवले किंवा माझी तपासणी केली.

**मा. सभापती सो. :-**

आपण मेटल-डिटेक्टर लावून इकडे यायला जागा ठेवलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यामध्ये आणखी एक सजेशन आहे की, त्या सुरक्षारक्षकामध्ये एक लेडिज सुरक्षारक्षक ठेवा. म्हणजे लेडिज येतात. त्यांचीसुध्दा चेकींग व्हायला पाहिजे. आपला जो एग्झिस्टींग दरवाजा आहे तो एकच दरवाजा आहे. त्याच्यामध्ये साईडला जे दरवाजे आहेत ते बंद होतात आणि येणारी लोक त्याच दिशेने येतात. आपल्या पालिकेमधून जे बाहेर जातात. त्यांनासुध्दा त्याच मशिनमधून यावे लागते.

**जयंत पाटील :-**

आपल्याला बाहेर जाण्यासाठी वेगळा मार्ग पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या महापालिकेला बाहेर जाण्यासाठी वेगळा दरवाजा पाहिजे. आपला जो बाहेर जाण्यासाठी दरवाजा आहे. तुम्ही तो दरवाजा बंद ठेवलेला आहे. तुम्ही तो दरवाजा ओपन ठेवा. म्हणजे बाहेर जाणारी लोक त्या दरवाज्याने जातील आणि एन्ट्री करताना डिटेक्टरमधून जातील.

**गीता जैन :-**

मगर वहॉपर बताने के लिये कोई चाहिए। पहले वैसे ही था। साईड का दरवाजा खुला था। वहॉपर बताने के लिए कोई भी मौजुद नही रहता है। इसलिये एकही दरवाजा खुला रहता है। वही दरवाजेसे आना-जाना चालू रहता है।

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपल्या महापालिकेच्या इमारतीला दोन ठिकाणी जिने आहेत. तसे पाहिले तर एकूण तीन जिने आहेत. परंतु, जे साईडचे जिने आहे त्यांचासुध्दा विचार करावा.

**एस. ए. खान :-**

तुम्हाला ते जिने बंद करावे लागतील.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

आपण साईडचे जिने बंद करूया. आपण त्या ठिकाणी मेटल-डिटेक्टर लावूया.

**गिता जैन :-**

साईडचे जिने लॉक करून ठेवा. म्हणजे प्रश्न येणार नाही.

**एस. ए. खान :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपल्याकडे जे कॉम्प्युटर आहेत. त्याबाबत मला असे विचारायचे आहे की आपल्याला पावत्या कधीपर्यंत मिळत राहतील. म्हणजे तुम्ही खोट्या पावत्या कधीपर्यंत देत राहणार आहात. मी तुम्हाला मागच्या वेळेला रू. ३९ हजाराची जुनी आकारणी झालेली होती त्याबद्दल सांगितले होते. ते ॲक्सेप्ट केल्यानंतर मान्य आहे म्हणून तुम्ही पत्र द्या. त्यानंतर ते बिल बनवून देतील. तुम्ही पत्र दिलेले नाही. परंतु, जे बिल घेतलेले होते आता त्याची एक महिन्याची मुदत संपलेली नाही. आता रू. साडे-चार हजाराचे व्याज एन्ट्री करून दिल्यानंतर येईल. ह्यात कॉम्प्युटरचा फॉल्ट काय आहे? काय मिस्टेक करून ठेवलेली आहे. कॉम्प्यूटरबाबतीत किती वेळा तक्रारी करायच्या? आता डोकेदुखी झालेली आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

श्री. एस. ए. खानसाहेब, तुमचे ह्याच्यामध्ये काय म्हणणे आहे?

**एस. ए. खान :-**

माझे रु. ४ हजार व्याज लावलेले आहे. त्याबाबत काय म्हणणे आहे?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

ही जी प्रॉपर्टी आहे ती सन १९९२ पासुनची आहे. तेव्हापासुन बिले दिले असतील.

**एस. ए. खान :-**

तेव्हापासुन बिले दिलेली नाहीत. नविन कर आकारणी केलेली आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

नवीन आकारणी केलेली नाही. सन १९९२ ते सन २००७ पर्यंतची कर आकारणी आहे. नवीन कर आकरणीचा प्रश्न येत नाही.

**एस. ए. खान :-**

परंतु, अजुनपर्यंत आकारणी केलेली नव्हती.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

परंतु, त्याचा जो काही कालावधी दिलेला आहे. तो दि. ०१/०४/९२ पासुनचा दिलेला आहे म्हणजेच सन १९९२ पासुनची ती प्रॉपर्टी आहे.

**एस. ए. खान :-**

आपण समान कर आकारणी केलेले आहे. त्यांनी कर आकारणी केलेली नव्हती. त्यांनी नविन अर्ज दिलेला होता की माझी कर आकारणी झालेली नाही. तुम्ही माझी कर आकारणी करून घ्या.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

दि. ०१/०४/१९९२ पासून ते दि. ३१/०३/२००७ पर्यंतची कर आकारणी झालेली आहे.

**एस. ए. खान :-**

आपले स्ट्रक्चर सन १९९२ पासुनचे आहे आणि तेव्हा कर आकारणी झालेली नव्हती. त्यामुळे कर आकारणी करून घ्या असे आपण लिहून दिलेले आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

तुम्ही हा जो कर आकारणीचा तक्ता घेतलेला आहे. तो जुनाच असावा.

**एस. ए. खान :-**

काय आहे? ते मला माहिती नाही. मी हा तक्ता बनवलेला नाही. तो कोणी बनवुन दिला ते मला माहिती नाही.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

माझी प्रॉपर्टी सन १९९२ पासून ते सन २००७ पर्यंत दाखवली ह्याचा अर्थ असा होतो की तुम्ही सन १९९२ पासुन बिले घेतात. ह्यापुर्वी सन १९९२ पासुन बिले दिली गेली असतील आणि सन १९९२ पासुन बिले दिली गेली नाहीत असे तुमचे म्हणणे आहे.

**एस. ए. खान :-**

माझे असे म्हणणे आहे की समजा, अजुनपर्यंत कर आकारणी करण्यात आलेली नव्हती असा अर्ज दिलेला आहे. कारण माझी प्रॉपर्टी सन १९९२ पासून आहे. माझे त्याबाबत ॲग्रीमेन्ट होते. ॲग्रीमेन्टची कॉपी देण्यात आलेली आहे. म्हणून त्यांनी मला सन १९९२ पासून रू. ४० हजार कर आकारणी करून दिलेली आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

माझे एवढेच म्हणणे आहे की जर त्यांची प्रॉपर्टी सन १९९२ पासून असेल तर त्यांची बिले सन १९९२ पासुन दिली गेली नसतील तर आणि सन १९९२ ची रक्कम त्यांच्याकडून त्यांनी पैसे भरले नसतील तरी येणार आहे.

**एस. ए. खान :-**

परंतु, आमची आकारणी झालेली नाही. म्हणून आमचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

ह्याच्यामध्ये कॉम्प्युटची चुक आहे. परंतु, तुम्ही जे सांगता त्यासंबंधी जे प्रभाग अधिकारी आहेत. त्यांच्याशी चर्चा करून ह्याबाबत निर्णय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की मला कॉम्प्युटरविषयी थोडे बोलायचे आहे. ज्यावेळेला लोकांची समांतर कर आकारणी झाली. आपण त्यावेळेला एक ठराव केलेला होता. तद्‌नंतर ज्या इमारतींना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली होती. आपण अशा इमारतींना समान दराने कर आकारणी केली. परंतु, आपण समान दराने कर आकारणी करूनसुद्धा आपण आपल्या प्रशासनातर्फे जी सुधारीत दरांची बिले लावायला पाहिजे होती ती दिली गेलेली नाहीत. लोकांनी जे जुन्या रेटप्रमाणे बिल येत नाही. त्या पध्दतीने पैसे भरलेले आहेत. यापुढे आपल्याजवळ ॲडव्हान्स म्हणुन जमा झालेले आहेत. आपल्याला त्याच्यासाठी निर्णय

घ्यावा लागेल की, त्यांना पुढच्या वर्षासाठी पुन्हा ॲडव्हान्स म्हणून जमा करावे लागेल आपल्याकडे समान कर आकारणी झालेली आहे.

**आर. डी. असोदेकर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी विचारलेल्या प्रश्नाला मा. आयुक्त साहेबांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे उत्तर देतो. सर्वप्रथम समान कर आकारणी बाबत महासभेचा जो ठराव आहे तो ठराव वाचल्यानंतर माझ्याकडे जी प्रकरणे आली. सध्या माझ्याकडे ४७ प्रकरणे आहेत. ४७ प्रकरणांपैकी आपण त्यांना सर्वसाधारणतः रु. ९८ हजार आपल्या महापालिकेच्या कायमच्या उत्पन्नातून निघून जातात. त्याच्यामध्ये असे आहे की, ह्या प्रकरणात गेल्यानंतर ह्यापूर्वीची जी प्रकरणे होती. त्याच्यामधून साधारणतः रु. ४० लाख ते ४२ लाख महापालिकेने सुट दिलेली होती. आता माझ्या माहितीप्रमाणे सर्वसाणारणपणे विविध प्रभागा कार्यालयामध्ये १२०० अर्ज प्रलंबित आहेत. माझ्याकडे ते अर्ज आल्यानंतर सर्वसाधारणपणे असा रु. १ कोटीचा तो महसुल आहे. ती सुट करणार आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भात समान आकारणी करताना ज्या अर्जावर निर्णय झालेले होते. त्या अर्जावर निर्णय झालेली जी प्रकरणे आहेत त्यांना सुधारित दराने बिले पाठवली जातील. परंतु, बिले दिली गेलेली नाहीत. परंतु, जी प्रकरणे आता ह्यांच्याकडे मंजुर झालेली आहेत. ती मंजुर झालेली प्रकरणे संबंधित विभागाकडे जातील. पुन्हा त्याच्यावर त्यांना बिले दिली जातील.

**एस. ए. खान :-**

परंतु, तुम्ही बिले कधी देणार आहात?

**शशिकांत भोईर :-**

माझा तसा प्रश्न नाही. त्यांची सुधारित कर आकारणी झालेली आहे. त्यांनी स्टेटमेन्ट दिलेले आहे. त्यामुळे प्रत्येकाला माहिती पडेल की, माझी कामे झालेली आहेत. सेक्रेटरीकडे प्रत्यक्ष स्टेटमेन्ट जमा झाले. तद्नंतर आपली बिले ऑगस्ट, सप्टेंबरला गेली. परंतु, ही प्रकरणे जुलै, ऑगस्टला झालेली होती. परंतु, त्यांना बिले दिलेली नाहीत. संबंधित विभागाशी आमच्या प्रभाग कार्यालयामध्ये जाऊन विचारणा केली. ते बोलले की तुमची सुधारित बिले लोकांना दिली जातील. तुम्ही टेन्शन घेऊ नका. परंतु, त्यांनी जुन्या दराने बिले दिली. आपण त्यांना ३ ते ५ टक्के सुट दिलेली होती. त्यांना वाटले की आमची कर आकारणी कमी झालेली नाही. त्यामुळे त्यांनी कर भरले असे आता जी स्टेटमेन्ट दिले ते अगोदरचे आहे. ते मंजुर झाले. त्यांनी ब-याच रक्कमा निर्लेखित केलेल्या होत्या. तद्नंतर आपल्याकडे त्यांचे पैसे ॲडव्हान्समध्ये आहेत. त्याच्या पुढच्या वर्षासाठी ॲडवान्समधून वर्ग करावेत.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

मी याबाबत संबंधित विभागाशी बोलतो. जे कोणी आयुक्त, उपायुक्त होते मी त्यांच्याशी सभा संपल्यानंतर चर्चा करेन. अशाप्रकारची किती प्रकरणे पेन्डींग आहेत? किंवा किती लोकांना बिले दिली गेली नाहीत. जर जुन्या दराने बिले भरली असतील तर त्यांना नक्की सवलत दिली जाईल.

**एस. ए. खान :-**

जी बिले दुरुस्तीसाठी पडलेली आहेत ती कधी येणार? आम्ही करेक्शनसाठी मिरारोडची बिले दिलेली होती. ती बरीच बिले आहेत. प्रभाग अधिका-यांना विचारले तर ते बिल सी.एफ.सी. ला गेलेली आहेत असे सांगतात. परंतु, ती बिले अजुनपर्यंत इथे आलेली नाहीत. तर तुम्ही बिले कधी परत देणार? ती लोक कधी पैसे भरणार? ते सांगा. तुम्ही ३१ तारखेपर्यंत नागरिकांना बिले देणार मग ती लोक पैसे कधी भरणार ते सांगा. मग तुम्ही व्याज लावणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे जी प्रकरणे आलेली आहेत. त्याच्यामध्ये काय त्रुटी आहेत. तुमच्याकडे ती प्रकरणे पेन्डीग आहेत का? प्रभाग अधिका-यांकडे पेन्डीग असतील तर सांगा.

**एस. ए. खान :-**

मग तुम्ही आता त्यांना कळविलेले आहे. त्यांनी काय पुर्तता करायची ते कळवलेले नाही का? संबंधित करदात्याला पुर्तता करायची आहे असे कळवलेले आहे का? तुम्ही प्रभाग अधिका-यांना कळवलेले नाही.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

प्रभाग अधिका-यांकडून जी बिले आलेली आहेत. त्या बिलांमध्ये काही त्रुटी आहेत. ती बिले पुन्हा त्यांच्याकडे पाठवावीत. त्या त्रुटींची पुर्तता करुन त्यांनी ह्यांच्याकडे पाठवायची आहेत. जे कोणी उपायुक्त असतील किंवा आयुक्तांच्या मंजुरीने जोपर्यंत त्यांच्याकडे जात नाहीत. तोपर्यंत ते करेक्शन करणार नाहीत.

**एस. ए. खान :-**

त्याची पुर्तता प्रभाग अधिकारी करणार आहेत की दुसरे कोण करणार आहेत?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

प्रभाग अधिकारी पुर्तता करणार आहेत.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये संबंधित कर भरणारे आहेत. त्यांच्याकडून कागदपत्र घ्यायची असतील तर त्यांना कळविले पाहिजे.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

म्हणजे त्याच्यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत. त्या आपण प्रभाग अधिका-यांना कळवलेल्या आहेत. प्रभाग अधिका-यांनी त्याची पुर्तता करायची आहे आणि पुन्हा आपल्याकडे सबमिट करायचे आहे.

**एस. ए. खान :-**

कधीपर्यंत पुर्तता करणार? संबंधित कर भरणा-याला कळविले नाही तर तो कागदपत्रे घेऊन येणार नाही.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.):-**

ही प्रकरणे किती दिवसापासून पेन्डीग आहेत?

**एस. ए. खान :-**

सहा महिने झाले.

**हेमंत पाटील :-**

मागच्या वर्षापासून जी प्रकरणे होती. त्याच्यावर काहीही कळवलेले नाही. परंतु, मी जेव्हा सी.एफ.सी. ला गेलो. त्याच्यानंतर मी ही प्रकरणे का पेन्डीग आहेत? जे जाणून घेतले. त्या संदर्भात मला ऑपरेटरनी लेखी रिपोर्ट दिला की या संदर्भात अशी कागदपत्रे अपूर्ण आहेत. त्यामुळे मी प्रभाग अधिका-यांना लेखी कळवलेले आहे की तुम्ही ह्या कागदपत्रांची पुर्तता करुन घ्या आणि वरिष्ठांच्या मंजू-या घेऊन द्या. आम्ही तात्काळ निर्देश दिलेले आहेत. सध्या ती प्रकरणे प्रभाग कार्यालयाकडे पाठवून दिलेली आहेत. त्यांची मंजूरी आल्यानंतर आम्ही तात्काळ करुन घेऊ.

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड सो.) :-**

ह्यावर्षी त्रुटींची पुर्तता करण्यासाठी प्रभाग अधिका-यांकडे जे प्रस्ताव पाठवलेले आहेत. ते प्रस्ताव सर्वसाधारणपणे त्यांच्याकडून एका आठवडयामध्ये मुख्यालयामध्ये येतील. अशाप्रकारचे आदेश दुपारनंतर त्यांना निर्देशित करण्यात येतील.

**एस. ए. खान :-**

मी बंदरवाडीच्या 'एफ' वॉर्डमध्ये गेलेलो होतो. मला त्यावेळेला असे आढळून आले की श्रीराम नगरबाबत गेल्या एक वर्षापासून करस्पॉन्डन्स करतो. परंतु, अजूनपर्यंत काही लोकांना बिले मिळत नाही. अजूनपर्यंत मिरा रोडमधील श्रीराम नगरच्या एकही वॉर्डचा सर्व्हे केलेला नाही. एक वर्ष झाले. माझ्याकडे पत्रसुद्धा आहे. जर ते पत्र माझ्याकडे आता उपलब्ध असते तर मी तुम्हाला दाखवले असते. जवळजवळ पंधरा महिने झालेले आहेत. श्रीराम नगरची प्रॉपर्टी 'एफ' वॉर्डमध्ये आहे. तिकडचे लोक येतात आणि पावत्या फेकून जातात. परंतु, तेथील नागरिकांना त्या पावत्या मिळत नाहीत. ते नागरिक त्या पावत्या भरत नाहीत.

**मा. आयुक्त सो. :-**

तुमच्याकडे अशी काही प्रकरणे असतील तर मला द्या मी माझ्याकडून त्याचा निपटारा करुन घेतो.

**एस. ए. खान :-**

मी तुम्हाला पत्र देतो.

**रोहिदास पाटील :-**

हा जो विषय आणलेला आहे की, रेल्वेच्या पश्चिम साईडला जी चौपाटी आहे. त्या लोकांनी त्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमाला बंदी केलेली होती. मग श्रीम. कैलासबेन जानी यांनी त्यावेळेला सह्यांची मोहिम राबवलेली होती. आपण त्यावेळेला असे ठरवलेले होते की मा. आयुक्तांनी त्याच्यावर त्वरित पत्र लिहावे. मग तुम्ही ते पत्र लिहिले की नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे की इतिवृत्तांत संदर्भात आपल्याला रेल्वे प्रशासनाकडून जे पत्र प्राप्त झालेले आहे. त्या संदर्भात जी चर्चा सभागृहात झालेली होती. त्या सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी रेल्वेला कळवायला पाहिजे होते की आपले जे काही सांस्कृतिक कार्यक्रम किंवा विधीवत कार्यक्रम नियमित होतात. आपण त्याला आपल्याकडून कुठलाही प्रतिबंध करु नये अशाप्रकारचे पण मी आज दुपारी निर्गमित करतो.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला त्यांच्या पलिकडे माहिती देतो की तुमच्याकडून लिहिलेले राहिले गेले. परंतु, आम्ही जे लिहिलेले होते. त्यात श्री. राम नाईकसाहेबांना पत्र लिहिलेले होते. श्री. राम नाईकसाहेबांना जी.एम. चे पत्र आलेले आहे. श्री. राम नाईक अभिनंदनास पात्र आहेत. त्यांना पत्र आलेले आहे की आमचा तसा कोणताही दृष्टीकोन नाही. मी एक पत्र श्री. वाणीसाहेबांना देऊन ठेवीन. तरीसुद्धा तुम्ही ते पत्र लिहा. कारण ते पत्र लिहून जाते. श्री. राम नाईकांनी मला पत्र लिहिले की हे पत्र आलेले आहे. त्याच्यामध्ये चौपाटीवर कोणीही प्रतिकार करणार नाही असे नमुद केलेले आहे. तसे ॲक्विझीशन मोठे नाही. आपण त्याचा थोडाफार पाठपुरावा

केला तर त्याचा फायदा होतो. त्यांच्या इतिवृत्तांतामध्ये माझे तीन विषय आहेत. आपण इतिवृत्तांत मंजूरी देतो. मटणाचे दुकान अंबामाता मंदिरजवळ आहे. आता साहेब नाहीत. ते इथे असले की आता जाऊन बंद करतो असे सांगतात. परंतु, बंद करित नाही. नवघर रोडला अंबामाता मंदिर आहे. ते प्रकरण पुष्कळ दिवसापासूनचे आहे. एक अंबामाता मंदिर आहे. त्याच्या बाजूला एकाऐवजी चार दुकाने झालेली आहेत. आराधना बिल्डिंगच्या पुढच्या बाजूला ही दुकाने आलेली आहेत.

**गीता जैन :-**

ते मंदिर आधी आहे की मटणाचे दुकान आधी आहे.

**रोहिदास पाटील :-**

मंदिर आधी आहे. तिथे मटणाचे एक दुकान आहे. पूर्वी एक दुकान होते. तोपर्यंत आम्ही तक्रार केलेली नव्हती. एका दुकानाच्या जोडीला चार दुकाने झालेली आहेत. ते बकरे सगळे उघडे आहेत. आम्ही सांगून दोन महिने झाले.

**गीता जैन :-**

तिथे एक दुकान होते की आणखी काही दुकाने होती.

**रोहिदास पाटील :-**

पूर्वी एक दुकान होते. आता जे दुकान आहे. आम्ही त्याची तक्रार करित नाही.

**गीता जैन :-**

एक दुकान उघडलेले बघून बाकीच्या लोकांनी दुकाने उघडली असतील.

**शशिकांत भोईर :-**

ती लोक मटणाची दुकाने उघडली तर हळूहळू बाकीची दुकानेसुद्धा उघडतात.

**मा. सभापती सो. :-**

मार्बलवाले मार्बल लाईनमध्ये लावतात. तशीच ही दुकाने इथे लावलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही त्याबाबत तक्रार केलेली नाही. परंतु, तक्रार केली तर काय होईल? आपण समजूतीने घेतो म्हणून प्रश्न सुटतात. दोन लोकांनी दुकाने बंद केली. तिथे एक माणूस दुकान बंद करित नाही. तो काय सांगतो? ते माहिती नाही. ते अधिकारी दुकान बंद करतो असे इथे सांगतात. परंतु, तिथे दुकान बंद करायला जात नाहीत. मी दुसरा प्रश्न मिरा रोडच्या आरक्षण क्र. १२२ बाबत विचारलेला होता. साहेब, ते आरक्षण क्र. १२२ मध्ये आरक्षण कमी होण्याऐवजी आणखी पत्रे टाकून तिथे बांधकाम चालू झालेले आहे. तिथे आरक्षण आहे. मी आरक्षण क्र. १२२ म्हणजे गोल्डन नेस्ट सिग्नलजवळील आरक्षणाबाबत बोलत आहे.

**जयंत पाटील :-**

ते गोडदेवमध्ये येते ना.

**रोहिदास पाटील :-**

त्याचा मौजे गोडदेव आहे. ते मैदान शहराची शान आहे. त्या मैदानाला पाच-सहा दुकाने होती. आता पाच-सहाऐवजी भरपूर भंगारवाले झालेले आहेत. आता त्या पत्र्याचे कंपाउन्ड बांधून आतमध्ये घेऊन बांधकाम चालू आहे की काय कोणास ठाऊक?

**जयंत पाटील :-**

हे खरे आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे कसे काय? मी माझ्या आयुष्यात कोणाचे अमुक करतो अशी तक्रार केलेली नाही. ते बांधकाम अमुक व्यक्तीचे आहे अशी आम्ही व्यक्ती म्हणून तक्रार करित नाही. परंतु, शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याच्यावर चर्चा होते आणि मग कृती होणार नाही असे तुम्ही कसे बोलता? आमची साधारणपणे अशी अपेक्षा आहे की इथे चर्चा झल्यानंतर १०० टक्के नाही तर ७०-८० टक्के कार्यवाही व्हायला पाहिजे. म्हणजे नुसते बोलायचे आणि जायचे असेल तर आम्ही हजेरी लावतो आणि जातो. साहेब, तुम्ही आरक्षण क्र. १२२ घ्या. आम्ही इतिवृत्तांताला मंजूरी देतो. परंतु, आपले मटणाचे दुकान बंद झालेले नाही. तुम्हाला जी माहिती हवी असेल मी ती रितसर देतो. आरक्षण क्र. १२२ हे खेळाचे मैदान आणि गोल्डन नेस्ट सिग्नल जवळील आरक्षण आहे. तिथे अतिक्रमण आहे. तुम्हाला सगळ्यांना माहिती आहे की तिथे चार झोपडपट्टीवाल्यांची दुकाने होती. आज त्या ठिकाणी मार्बलचा धंदा चालू झालेला आहे. तिथे एक मशिद होती. त्या मशिदची जागा सोडून महापालिकेने अन्य जागा खाली केलेली होती. ते सगळे तोडलेले होते. आता तिथे पुन्हा किती बांधकाम झाले? एकतर आता तिथे पत्र्याचे बांधकाम झाले. तिथे संपूर्ण पत्रे लावून आतमध्ये काय झालेले आहे? ते माहिती नाही. ते मोठे बांधकाम होते. तुम्ही मला तीन प्रश्नांची एकदम उत्तरे द्या. जसे बिल्डर बांधकाम करतो तसे ते बांधकाम होते. आरक्षण क्र. १२२ म्हणजे गोल्डन नेस्टचा जो रस्ता समुद्रकिनाऱ्याकडे जातो तो रस्ता ९० फूट आणि त्याच्या बाजूला १५-१५ फूट म्हणजे १२० फूटचे बांधकाम आहे. श्री. राम नाईकसाहेबांनी सगळी भाषणे केलेली होती. त्या रस्त्यामध्ये १+२ मजल्याची बिल्डिंग उभी राहिली. साहेब, दिड-दोन महिन्यामध्ये रस्त्यामध्ये बिल्डिंग उभी राहते का? सभागृहात जी चर्चा होते. त्याच्यावर काहीही अंमलबजावणी होत नाही. तुम्ही

आम्हाला सांगा की अमुक बिल्डिंगबाबत कोणी बोलू नका आम्ही बोलणार नाही. मा. सभापतीसाहेबांनी सांगितले की श्री. रोहिदास पाटील यांनी इथे बोलायचे नाही तर आमची तुम्हाला खरोखर अशी रिक्वेस्ट आहे की तुम्ही आम्हाला बोलायला सांगितले किंवा सन्मा. सदस्य हंसूकूमार पांडे यांनी आम्हाला बोलायला सांगितले तरी आम्ही बोलणार नाही. परंतु, जर मेन रोडवर बिल्डिंग बनायला लागली तर जर कोणी कोणाचे ऐकत नसेल तर आम्ही कशाला बोलायचे?

**अजित पाटील :-**

सर्व्हे नं. २१८ मध्ये नाल्याला लागून बिल्डिंग झालेली आहे. त्यांनी पूर्वी दुरुस्तीची परवानगी दिलेली होती. त्यांनी त्याच्यानंतर दुरुस्तीला सुरुवात केली. आपण नोटीस काढल्यानंतर त्यांनी कोर्टातून स्टे घेतलेला आहे आणि आता स्टेटेस्को मेन्टेन करण्याबाबत कोर्टाचे आदेश आहेत. ज्या दिवशी स्टे दिला त्याच्यानंतर त्यांनी बांधकाम वाढवलेले आहे. त्याबाबत विधी अधिका-यांना विचारलेले आहे. स्टेच्या व्यतिरिक्त आलेले बांधकाम तोडणेबाबत आम्हाला मार्गदर्शन व्हावे असे पत्र दिलेले आहे. अजूनपर्यंत विधी अधिका-यांकडून माहिती आलेली नाही. कोर्टाकडून स्टे घेतलेला आहे आणि बांधकाम तोडत नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

कोर्टाने ज्या स्टेजला स्टे दिलेला असेल कोर्टाने त्यांना पहिल्या मजल्यापर्यंत स्टे दिलेला असेल आणि त्यांनी स्टे मिळाल्यानंतर दुस-या मजल्याचे बांधकाम केले असेल तर ते दुस-या मजल्याचे बांधकाम तोडून टाका. त्याच्यासाठी विधी अधिका-यांची गरज नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी तुम्हाला एक उदाहरण देतो. मी मागच्या वेळेला म्हटले होते की आपल्या कुठल्याही डिपार्टमेन्टचा कुठल्याही डिपार्टमेन्टशी को-ऑर्डिनेश नाही. काशिमिरालासुद्धा सेम प्रॉब्लेम झालेला होता. काशिमि-याला रस्ता बनत होता. काशिमि-याला रस्ता बनत असताना तो माणूस स्टे घेऊन आला. स्टे घेतल्यानंतर बांधकाम विभागाने स्टे आहे आहे असे सांगून बांधकाम थांबवले. परंतु, स्टेमध्ये काय-काय लिहिलेले आहे? ते कोणालाच माहिती नाही. त्या स्टेमध्ये स्टेटेस्को मेन्टेन करा असे लिहलेले आहे. स्टेटेस्को मेन्टेन करा म्हणजे ज्या ठिकाणी लोकांनी ॲप्लीकेशन केलेले आहे. त्या सर्व्हे नंबरमध्ये स्टे आहे आणि बाकीचे सर्व्हे नंबर ओपन आहेत. परंतु, बांधकामवाले रस्ता करायला मागत नाहीत. बांधकामवाले सांगतात की, आम्ही विधी अधिका-यांना खुलासा करायला सांगितलेला होता. विधी अधिकारी खुलासा करेल. आम्ही त्याच्यानंतर बांधकाम करु. विधी अधिका-यांनी खुलासा केल्यानंतर आम्हाला पोलिस सपोर्ट करित नाहीत. आम्हाला पोलिस त्रास देतात. हे एकमेकांचे को-ऑर्डीनेशन होत नसल्यामुळे ही अशी प्रकरणे घडत चालेलेली आहेत. अनधिकृत बांधकाम वाढत चाललेली आहे आणि कोणतेही डिपार्टमेन्ट कुठल्याही प्रकारे सहकार्य करित नाही. हे आताचे उदाहरण आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही विषय टाळू नका. मुख्य प्रॉब्लेम त्या गटारात आहे. तुमचे गटार डिस्टर्ब होत आहे. त्या बिल्डरने अनधिकृत बांधकाम दुसरीकडे केले तर आम्हाला त्याच्याशी काहीही देणंघेणं नाही. तो तुमचा लुकआऊट आहे. जर तुम्ही मुख्य गटार किंवा नाला साफ केला तर भविष्यामध्ये कायमचा प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल. तुम्ही ते बघून करा.

**मा. आयुक्त सो. :-**

जर आपण दुरुस्तीची परवानगी दिलेली असेल तर आपण करु शकतो.

**जयंत पाटील :-**

परंतु, आपण दुरुस्तीच्या परवानग्या रद्द केलेल्या आहेत.

**अजित पाटील :-**

विधी अधिका-यांनी परवानग्या रद्द केलेल्या आहेत असे नमुद केलेले आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

जर परवानगी रद्द केली असेल आणि कोर्टाचा स्टे ज्या स्टेजला असेल तिथपर्यंत त्या बिल्डरचे बांधकाम ठेवायला हरकत नाही. परंतु, जर त्याच्यावर कन्टेम्प्ट केलेले असेल तर त्यांनी कन्टेम्प्टची प्रोसेस सुरु करायला पाहिजे. वर जेवढे बांधकाम झालेले असेल तर बांधकाम तोडायचे आणि कोर्टाला त्याबाबत कळवायचे.

**अजित पाटील :-**

त्यांनी आपल्याकडे गायडन्स मागितलेले होते. मग विधी अधिका-यांनी ते गायडन्स द्यायला पाहिजे. त्यांनी स्वतः पत्र दिलेले आहे. मग विधी अधिका-यांनी गायडन्स द्यायला हरकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विधी अधिकारी लांब राहत नाही. श्री. अजित पाटीलसाहेब, तुम्ही पहिल्या मजल्यावर आहात आणि विधी अधिकारी तिस-या मजल्यावर आहेत. मग तुम्हाला विधी अधिका-यांना बोलावून गायडन्स घ्यायला पाहिजे. ऐवढेसुध्दा समजत नाही का? हे चुकीचे आहे.

**अजित पाटील :-**

आम्ही विधी अधिका-यांबरोबर फोन करुन चर्चा केली तर विधी अधिका-यांनी माहिती आणते असे सांगितले होते. शिवाय, आम्ही ताबडतोब दुस-या दिवशी पत्र दिलेले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. अजित पाटीलसाहेब, तुम्ही जे काही चांगले काम करता त्याचे सभागृहाने अभिनंदन केलेले आहे. परंतु, तुम्ही या छोट्याश्या कामांसाठी विधी अधिका-यांकडे जावे लागत आहे आणि विधी अधिका-यांबरोबर बसा आणि त्यांना विचारा.

**अजित पाटील :-**

विधी अधिका-यांकडून परवानगी रद्द केल्यानंतर हेअरिंग झाल्यानंतर त्यांनी आम्हाला याचे मार्गदर्शन करावे अशा आशयाने आम्ही त्यांना ताबडतोब माहिती विचारलेली होती. तुम्हाला अतिक्रमण विभागाला हे बांधकाम तोडायचे नाही तर ते बांधकाम तोडता येईल की नाही आम्ही याबाबत विधी अधिका-यांना माहिती विचारलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

आता या मिटींगला विधी अधिकारी उपस्थित नाहीत. आपण विधी अधिकारी नेमलेले आहेत. विधी सभापती नेमलेले आहेत. परंतु, रस्त्यावरील एकही अनधिकृत बांधकाम निघत नाही. कोणीही येऊन कुठेही बांधकाम करणार असे चालणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्याला विधी अधिका-यांनी काय सल्ला दिला?

**अजित पाटील :-**

विधी अधिका-यांनी काहीही सल्ला दिलेला नाही.

**जयंत पाटील :-**

जर आपण स्थायी समितीमध्ये चर्चा करुन वकीलांसाठी तरतुद केली तर ते चालणार नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

श्री. अजित पाटील, हे जे पर्टीक्युलर बांधकाम आहे. ते बांधकाम कोणाचे आहे? आपण त्यांना महापालिकेच्या कायद्यानुसार नोटीस दिलेली होती का? आपण ती नोटीस दिल्यानंतर त्याचे हेअरिंग घेतलेले होते का? जर आपण त्यांचे हेअरिंग घेतले असेल तर त्याच्यावर मा. आयुक्तांनी जो काही निर्णय दिलेला असेल त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली का? याची सभागृहाला माहिती द्या.

**अजित पाटील :-**

ह्या संदर्भात हेंअरिंग झालेले होते आणि कोर्टात स्टे असल्या कारणाने अजुनपर्यंत त्याबाबतचा मा. आयुक्तसाहेंबांचा आदेश निघालेला नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

तुम्ही कोणत्या प्रकरणाबाबत बोलत आहात ते सांगा.

**अजित पाटील :-**

सर्व्हे नं. २१८ (९) हे नाल्यावरील बांधकामाबाबतचे आहे. आपण त्याची हेअरिंग घेऊन रिपेरिंगची परवागनी रद्द केलेली आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

विधी अधिकारी, तुम्ही तुमच्याकडे उशीरापर्यंत प्रस्ताव का ठेवला? तुम्ही त्यांना मार्गदर्शन का केले नाही?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

आम्ही मार्गदर्शन केलेले होते.

**मा. आयुक्त सो. :-**

तुम्ही फाईल मागवा. कारण तुमच्यामध्ये कॉ-ऑर्डीनेशन होत नाही. मिस अंडरस्टॅन्डीग होत आहे असे मला वाटते.

**जयंत पाटील :-**

ह्यांच्यामध्ये कॉ-ऑर्डीनेशन नाही.

**एस. ए. खान :-**

ह्यांच्यामध्ये कॉ-ऑर्डीनेशन नाही.

**मा. आयुक्त सो.:-**

आपल्याला सगळ्या फाईल मागवाव्या लागतील.

**जयंत पाटील :-**

आपण केसेस हरण्यासाठी प्रयत्न करित आहोत असे मला वाटते. मी त्या दिवशीसुध्दा हेच बोललो होतो. आपण अंदाजपत्राकामध्ये वकीलांसाठी जी तरतुद केलेली होती ती केसेस हरण्यासाठी करतो असे असेल तर आपल्याला विधी अधिका-यांची गरज नाही. आपण अजुनपर्यंत एकही केस जिंकलेलो नाही. सतत

गटारामध्ये बांधकाम झालेले आहे. मी ही कम्प्लेन्ट पहिल्या दिवशी एका अधिकाऱ्याकडे केलेली होती. त्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब इंजिनियरला पाठवले आणि त्या इंजिनियरने असा रिप्लाय दिला की हे बांधकाम गटारामध्ये नाही. मला ऐकून आश्चर्य वाटले.

**मा. आयुक्त सो. :-**

ते इंजिनियर कोण आहेत?

**जयंत पाटील :-**

तो आपल्याकडील इंजिनियर आहे. खरे म्हणजे कमिशनरसाहेबांनी स्वतःहून बघायला पाहिजे.

**मा. आयुक्त सो. :-**

दुरुस्तीची परवानगी दिली तर कसे होईल?

**जयंत पाटील :-**

साहेब, दुरुस्तीच्या परवानगीचे काय नियम आहेत? ते बघा.

**रतन पाटील :-**

परंतु, तिथे बिल्डींग होती ना.

**जयंत पाटील :-**

तिथे बिल्डींग होती आणि त्या गटारावर चाळ होती. तुम्ही त्यांना विचारा.

**रतन पाटील :-**

तिथे चाळ होती.

**रोहिदास पाटील :-**

माझी पाच वर्षातील एकाही विषयावर कुठलीही ॲक्शन झालेली नाही. म्हणून मी सांगितले की, इथे येऊन फक्त चर्चा करायची की काय करायचे?

**मा. आयुक्त सो. :-**

या ठिकाणी बांधकाम आहे असे दाखवलेले आहे. म्हणजे त्यांनी तिथे कोर्टाची दिशाभूल केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

त्यावेळेला आपले वकील कोण होते?

**मा. आयुक्त सो. :-**

आपल्या वकील सौ. आपटे मॅडम होत्या.

**जयंत पाटील :-**

आपल्या वकीलांनी कोर्टाची काय बाजु मांडलेली होती?

**गीता जैन :-**

तिथे आपल्या पालिकेचे ॲडव्होकेट असतात. जर त्यांनी दिशाभूल केली असेल तर आपल्या वकीलांना त्याची माहिती असेल ना.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्यांना त्यावेळेला माहिती नव्हते. आता त्यांना माहिती झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

सौ. आपटे मॅडमनी काय अर्ग्युमेन्ट केलेली होती. ती आम्हाला दाखवा.

**मा. आयुक्त सो. :-**

आपले वकील केसला जातात ना. मग तुम्ही ही इन्फॉर्मेशन कशी काय देणार आहात?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, काशिमिऱ्याच्या केसमध्ये आपले वकील श्री. साळवी एकदासुध्दा हजर राहिलेले नव्हते. आमच्या मित्राने पर्सनली एक वकील उभा करुन कन्टीन्युअस फाईट केले आणि फायनल जजमेन्ट तयार केलेले होते. आपले वकील तिथे उभे राहीलेले नाहीत. मी हे जवळून बघितलेले आहे आणि मला अनुभव आहे म्हणून मी बोलतो.

**मा. आयुक्त सो.:-**

ह्यांनी आताच्या अर्जामध्ये उल्लेख केलेला आहे.

**गीता जैन :-**

आपण काहीतरी कन्डीशन केलेली असेल ना.

**रोहिदास पाटील :-**

ह्या शहराच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या ९० फुट रस्त्यामध्ये महापालिकेचे सक्षम अधिकारी जागरुक असतानासुध्दा तुम्ही ८४ नगरसेवक काही कामाचे नाही का? ते सांगा. तुम्ही सगळे कामाचे आहात. सगळे असताना त्या रस्त्याचे बांधकाम होते हे योग्य नाही. कोणीतरी दुरुस्तीबाबत बोलले तर तुम्ही १२० फुटमध्ये दुरुस्तीची परवानगी कशी दिली? तो डी.पी. रोड आहे. ते बांधकाम चालू आहे. गटार बनते, डांबरीकरण चालू आहे. भरणी चाललेली आहे. ही किती चिंतेची बाब आहे. तुम्ही ती बिल्डींग तोडली किंवा तोडली नाही तरी त्याच्यामध्ये काहीही रुची नाही. तुम्हाला विधीसाठी कार्यपध्दती पाहिजे. आपण आपले विधी अधिकारी आणले.

त्यांना असिस्टंट पाहिजे म्हणून असिस्टंट दिले. आपल्याला अतिक्रमण खाते पाहिजे. म्हणून अतिक्रमण खाते दिले. जर एखादे मोठे काम म्हणजे स्वतःची खाजगी जागा असेल आणि त्यांनी बांधकाम केले असेल तिथे एफ.एस.आय. चुकवला असेल किंवा ती जागा बिलकुल अनधिकृत असेल तर वेगळी गोष्ट आहे. परंतु, आपण रस्त्यामध्ये संरक्षण करु शकत नाही.

**मा. आयुक्त सो.:-**

त्याच्यामध्ये सुरुवातीला जे अर्ज दिलेले होते. ते सगळे कोर्टाला लक्षात आणून द्या.

**गीता जैन :-**

पाठीमागे जी जागा आहे ती शिफ्ट करुन घ्या.

**जयंत पाटील :-**

परंतु, पाठीमागे बिल्डींग झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे सर्व रकॉर्डवर येऊ द्या.

**गीता जैन :-**

तुम्ही एन.ओ.सी. दिलेली आहे का? ते समजत नाही.

**मा. सभापती :-**

आपण एन.ओ.सी. दिलेली होती. परंतु, ती एन.ओ.सी. कॅन्सल केलेली आहे.

**रतन पाटील :-**

एन.ओ.सी. रद्द केलेली आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला अशी एन.ओ.सी. देता येत नाही.

**मा. आयुक्त सो.:-**

ह्याच्यामध्ये ग्राऊंड प्लस तीन मजल्याचे बांधकाम आहे. पूर्वी स्टेमध्ये ग्राऊंड प्लस वनचे बांधकाम होते. मग ग्राऊंड प्लस वनला परमिशन द्यायला पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

कदाचित, ग्राऊंड प्लस वनचे जे बांधकाम आहे त्याला स्टे मिळाला असेल म्हणून त्यांनी ग्राऊंड प्लस थ्री अशी दिशाभूल केलेली असेल.

**गीता जैन :-**

आपल्याकडे आपल्या माहितीसाठी रेकॉर्ड असेल ना.

**मा. आयुक्त सो.:-**

असे प्रश्न सॉल्व्ह करण्यासाठी आपले वकील आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जर त्यांनी कोर्टाची दिशाभूल केलेली असेल तर त्यांनी आपल्या वकीलांना कोर्टात नेऊन आपली बाजु मांडायला पाहिजे आणि कोर्टात अपिल करायला पाहिजे. त्यांनी कोर्टाला फसवलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या विधी अधिकारी मॅडम, काय काम करतात? त्या विधी अधिकारी आहेत. त्या आपल्या वकील म्हणून काम करतात आणि या विधी अधिकारी इथेच राहतात. सौ. आपटे बाई तर ठाण्याला राहतात. तुम्ही त्यांना बरोबर रिपोर्टींग केले नसेल तर वेगळी गोष्ट आहे. परंतु, विधी अधिकारी इथेच राहतात.

**मा. आयुक्त सो.:-**

आपले वकील हजर असतील तर याला आपल्या वकीलांनी ऑब्जेक्शन घेतले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मी याच्या पलिकडे माहितीसाठी सांगतो की, हे बांधकाम सरसकट चालू आहे. हा एक भावनेचा विषय आहे की तिथे एक मंदिर आहे. ते मंदिर सन्मा. सदस्या गीता जैन यांच्याशी संबंधित असेल, जर तिथे गटार जाते म्हणून मंदिर तोडायला लागेल म्हणून आपले सर्व्हेअर सारखे-सारखे तिथे जात आहेत. तिथे १५० लोक जमा होत आहेत.

**मा. आयुक्त सो. :-**

जर त्यांनी तिथे सर्व्हे केला असेल किंवा दोन्ही पार्टीने करायचे असेल तर तो बिल्डर बांधकाम चालू करतो आणि आपण फक्त स्टे आहे म्हणून गप्प बसतो. हे बरोबर नाही. जर त्यांचे बांधकाम चालू असेल तर ते बांधकाम तोडा आणि कोर्टाला कळवा.

**मा. सभापती सो.:-**

ते बांधकाम चालू असताना आणि त्या बांधकामावर स्टे असताना श्री. भोईर यांनी ते बांधकाम तोडलेले होते. बांधकामाचे काम करित असताना ते बांधकाम तोडून आलेले होते. जर तुम्हाला खोटे वाटत असेल तर तुम्ही श्री. तायशेट्येंना बोलवा.

**मा. आयुक्त सो.:-**

आपण श्री. भोईर यांचे बांधकाम तोडले होते.

**मा. सभापती सो.:-**

परंतु, त्यांच्याकडे स्टे होता.

**एस. ए. खान :-**

अधिका-यांच्या मनात जे बांधकाम तोडायचे असेल ते बांधकाम तोडणार आणि ते बांधकाम तोडायचे मनात नसेल तर ते बांधकाम तोडणार नाही असे चालले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्हाला लोकांच्या भावनेची कदर पाहिजे.

**एस. ए. खान :-**

ही लोक ते बांधकाम लिगल आहे की इललिगल आहे ते बघत नाही. त्यांच्या मनात जे असेल ते करतात.

**मा. आयुक्त सो.:-**

ह्या लोकांनी स्टे असतानासुध्दा असे-असे बांधकाम केलेले आहे आणि आम्ही ते बांधकाम तोडतो असे कोर्टाला कळवा.

**मा. सभापती सो.:-**

ते बांधकाम स्टे असताना केलेले होते असे तुम्ही कोर्टाला कळवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नगरपालिकेने त्या कामाबद्दलचा सर्व्हे करु नये म्हणून तुम्ही तिथे बोर्ड लावा.

**जयंत पाटील :-**

तो वेगळा भाग आहे.

**मा. सभापती सो. :-**

गटारा विषयीचा प्रश्न आलेला आहे म्हणून मी बोलतो.

**मा. आयुक्त सो. :-**

ह्या प्रकरणामध्ये कोर्टाचा जो स्टे आहे. त्यांनी कोर्टाच्या स्टेमध्ये जे ॲप्लीकेशन केलेले आहे. त्याच्यामध्ये १ प्लस ३ चा उल्लेख केलेला आहे. आता मी त्यांना असे इन्स्ट्रक्शन दिले की तुम्ही त्या ठिकाणी जा आणि त्या ठिकाणी लगेच पंचनामा करुन त्या ठिकाणी काम चालू आहे असे दाखवा. स्लॅब झालेला असेल तर तो तोडून टाका. स्टे असतानासुध्दा त्यांनी स्टे मेन्टेन केलेला नाही. म्हणून बांधकाम तोडले असे तुम्ही कोर्टाला कळवा आणि जे काही उर्वरीत बांधकाम आहे आपण त्याच्यावर कोर्टाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करुया.

**एस. ए. खान :-**

साहेब, तसे व्हायला पाहिजे. परंतु, तसे होत नाही. तुम्ही खाली एवढा मोठा बोर्ड लावलेला आहे की, ह्या अवधीमध्ये एवढे-एवढे बांधकाम होणार आहे. परंतु, जे बांधकाम झालेले आहे तुम्ही त्याबाबत मिरा रोडला आणि सगळीकडे बोर्ड लावलेले आहेत. एकही काम अवधीमध्ये होत नाही. तुम्ही मला एक असे काम सांगा की हे काम अर्ज दिल्यानंतर होते. दोन दिवसांचा कालावधी दिला, एक महिन्याच्या कालावधी दिला तरी त्या कालावधीमध्ये हे काम झालेले आहे का? अधिका-यांच्या जसे मनात येईल तसे बांधकाम तोडतात.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्ही मागच्या बजेटला जो आदेश काढलेला होता तो आमच्याकडे आलेला होता. आपण एकतर अनधिकृत बांधकाम करतेवेळी बांधकाम विभागाशी संबंधित त्यांची परवानगी घेऊन त्यांना प्रत्यक्षात दाखवून आपण अशा पध्दतीने एका आदेशाने आदेश काढला आणि लगेच दहा दिवसानंतर दुसरा आदेश काढला की ह्याची काहीही गरज नाही. आज ही बिल्डींग नगरपालिकेच्या गटारामध्ये उभी राहते. मग ह्याची जबाबदारी कोणाची आहे? जर ती जबाबदारी बांधकाम विभागाची असेल तर बांधकाम विभागाने त्याची प्रत्यक्षात पाहणी केली असती. आज बांधकाम विभागाने ती जबाबदारी ढकलून टाकलेली आहे. कारण त्या ठिकाणी बिल्डींग उभी राहिली तर आपल्याला माहिती आहे की हे अनधिकृत बांधकाम होत आहे. तरीसुध्दा ते तोडण्याची कार्यवाही आपण कधीच करित नाही. या ठिकाणी उंदिर आणि मांजराचा खेळ चालू आहे. आम्ही फक्त बोलायचे, आपण फक्त ऐकायचे आणि अधिका-यांना फक्त तसे आदेश द्यायचे. प्रत्येक महासभा असु द्या किंवा स्थायी समिती असु द्या. हेच झालेले आहे की आरक्षणे मोकळी करा. आरक्षणामध्ये जी बांधकामे होतात. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरिकांसाठी जी आरक्षित केलेली जागा आहे. अजुनपर्यंत त्याच्यामध्ये बांधकामे होत आहेत. आपण त्याच्यासाठी कठोर भुमिका घ्यायला नको आहे का? की आम्ही फक्त बघत रहायचे.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, सात-बारा उतारा कोणाच्या नावावर आहे. त्याचे बांधकाम कोण करतो?

**गीता जैन :-**

श्री. अजित पाटील, सर्व्हे नं. २१४ मध्ये पत्रे लावलेले आहेत. ते गार्डनचे रिझर्व्हेशन आहे. तुम्ही गार्डन डेव्हलप करीत नाही. तिथे अतिक्रमण होत चाललेले आहे. मी आरक्षण क्र. १२२ बाबत गेले एक वर्षापासून सांगत आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय मागच्या वेळेलासुध्दा आलेला होता.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण पत्रे टाकायला परवानगी दिलेली होती. जर ती पालिकेची जागा असली तरी त्यांनी कंपाऊंड टाकायला परवानगी सांगायला पाहिजे होती.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्ही असे का बोलता? आरक्षण क्र. १२२ आज आता कंपाऊंड घालायची महापालिकेने परवानगी द्यावी. ते आरक्षण नागरिकांच्या हितासाठी ठेवलेले आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की आपल्याकडे अर्ज करायला पाहिजे. आपल्याकडे अर्ज न करता त्यांनी कंपाऊन्ड घातलेले असेल तर आपण ते कंपाऊंन्ड एकतर्फी काढून टाकावे.

**रतन पाटील :-**

तुम्ही ते कंपाऊंन्ड काढून टाका. आपल्याकडे जागा हस्तांतरीत झाली किंवा झाली नाही तरी तुम्ही अतिक्रमण झाले तेव्हा उपस्थित होतात.

**गीता जैन :-**

आरक्षण क्र. १२२ ची जागा हस्तांतरीत झालेली आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे आरक्षण क्र. १२२ ची जागा हस्तांतरीत झालेली आहे.

**अजित पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे आरक्षण क्र. १२२ ही जागा हस्तांतरीत झालेली नसली तरी त्या जागेवर अतिक्रमण झाल्यानंतर तुम्ही बोलणार का?

**गीता जैन :-**

त्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. तुम्ही ती जागा हस्तांतरीत करुन घ्या असे मी गेले वर्षभर बोलत आहे. श्री. रतन पाटील असे ओरडून एक वर्ष झालेले आहे. तुम्ही आरक्षण क्र. २१४ चा विषयसुद्धा नीट करुन घ्या.

**जयंत पाटील :-**

गटाराच्या जागेवर जे बिल्डिंगचे बांधकाम चाललेले आहे. तुम्ही तो विषयसुद्धा घ्या. ते बांधकाम कोण करतो? त्याचा बिल्डर कोण आहे? सात-बारा उतारा कोणाच्या नावावर आहे? तुम्हाला काहीही माहिती नाही. तुमच्या विधी अधिका-यांनासुद्धा काहीही माहिती नाही. फक्त केबिन धरून बसायचे. या शहराचे वाटोळे होत चाललेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्यासारख्या सनदशीर मार्गाच्या लोकांना शंभर कागदपत्रे आणायला सांगतात.

**जयंत पाटील :-**

मग तुम्हाला रु. १० हजार पगार कशाला द्यायचा?

**रोहिदास पाटील :-**

त्या ठिकाणी मार्बलवाले आलेले आहेत, मशीद वाढलेली आहे.

**जयंत पाटील :-**

सात-बाराचा उतारा कोणाच्या नावावर आहे?

**मा. आयुक्त सो. :-**

जर तिथे अतिक्रमण असेल तर काढावे लागेल.

**जयंत पाटील :-**

सात-बाराचा उतारा कोणाच्या नावावर होता?

**रोहिदास पाटील :-**

पूर्वी तीन गाळे होते. नंतर एक गाळा काढला आणि तो बिल्डर निघून गेला. राष्ट्रवादी कॉग्रेससुद्धा निघून गेली.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, जर त्या लोकांनी जागा गटारामध्ये असेल तर तुम्ही त्या लोकांसाठी टी.डी.आर चे प्रोव्हिजन करु शकता. त्यांना कन्स्ट्रक्शन करण्याची परवानगी कोणी दिली?

**मा. आयुक्त सो. :-**

या ठिकाणी रिपेरिंगची परमिशनची दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गटारामध्ये रिपेरिंगची परमिशन देणार का? तुम्ही रिपेरिंगची परमिशन कशी दिली?

**एस. ए. खान :-**

तुम्ही रिपेरिंगची परमिशन कुठल्या बेसवर दिली.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ज्या लोकांना रिपेरिंगची परमिशन दिलेली आहे. ती लोक कुठल्या पक्षातील आहेत. तुम्ही कोणाच्या सोयीसाठी परमिशन दिली? ते कुठले नगरसेवक आहेत?

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करायला पाहिजे. कुठल्या अधिकाऱ्याने रस्त्यामध्ये बांधकाम घेऊन काय म्हणून परवानगी दिली?

**मा. सभापती सो. :-**

तो एरिया केवढा मोठा आहे.

**जयंत पाटील :-**

तो एरिया एकदम लहान आहे. तुम्ही तिथे जाऊन बघा.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही प्रत्येक परवानगनी कशी दिली? अशी परवानगी देता येत नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

श्री. अजित पाटील, तुम्ही एक काम करा. आता त्या ठिकाणी माणसे पाठवा आणि त्याच्या वरचे जे काही स्लॅब झालेले असेल तो देता येईल का? त्याचा इथे पंचनामा करा तो पंचनामा करुन कोर्टाला सादर करा आणि कोर्टाच्या हे सर्व काही लक्षात आणून द्या.

**तूळशीदास म्हात्रे :-**

साहेब, आपल्याकडील अधिकारी श्री. दिलीप घेवारे कुठे आहेत? त्यांना काही कळत नाही का? आता दुसरीकडे काम चालू आहे. तेसुद्धा बंद करुन टाकतात ही प्रोसिजर अतिक्रमण विभागावर अवलंबून आहे. मला अधिकाऱ्यांबाबत वाईट बोलता येते. परंतु, मी बोलत नाही. मला या ठिकाणी काहीही बोलता येते.

**गीता जैन :-**

माझे असे म्हणणे आहे की दुकानांच्या गाळ्यांना रितसर परवानगी का मिळत नाही?

**रोहिदास पाटील :-**

मी पुस्तक वाचलेले आहे. शासनाचे पत्रक असे निर्देश देऊ शकत नाही. जर लॅन्डलॉर्डची जागा असेल तर आम्ही सुद्धा येथील स्थानिक आहोत. आमची जागा आहे. आम्ही आमच्या जागेत बांधकाम करतो तेव्हा तुम्ही ही जागा विकासकर्त्यांची आहे असे सांगता. त्या जागेचा विकास झालेला आहे असे सांगता. त्यांनी ती जागा खरेदी केली म्हणजे भलत्यांसाठी कशीही खरेदी केली म्हणून त्यांना न्याय द्यायचा का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. रोहिदास पाटील मा. पालकमंत्र्यांनी आदेश-निर्देश दिलेले नाहीत मला माहिती आहे.

**रोहिदास पाटील :-**

ती जागा आरक्षणामध्ये आहे. त्यांची जागा आरक्षणामध्ये असल्यामुळे त्यांना बेनिफिट द्या. परंतु, आरक्षण बदलत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्या जुन्या झोपडया आहेत.

**जयंत पाटील :-**

मग अजूनपर्यंत जुन्या झोपडयांना टॅक्स का लावला नाही? ह्या झोपडया किती जुन्या आहेत?

**तूळशीदास म्हात्रे :-**

ह्या झोपडया सन १९८० पासूनच्या आहेत.

**जयंत पाटील :-**

मग त्यांना अजूनपर्यंत टॅक्स का लावलेला नव्हता?

**तूळशीदास म्हात्रे :-**

काही झोपडयांना टॅक्स लावलेला आहे आणि काही झोपडयांचा टॅक्स बाकी आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, तुम्ही सगळ्या झोपडयांना टॅक्स का लावला नाही?

**रतन पाटील :-**

तुम्ही सगळ्या झोपडयांना टॅक्स का लावला नाही? त्यांना टॅक्स लावायची त्यांची जबाबदारी आहेत. ते नागरिक सन १९८० पासून इथे राहतात.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्ही ह्या झोपडयांना टॅक्स लावून घ्या. काय टॅक्स लागेल? ते बघा. जो टॅक्स लागेल त्याबाबत तुमचे लेखी पत्र आहे. तुमच्याकडे लोकांनी डॉक्युमेंट सादर केले का? ह्या घरपट्टीच्या पावत्या आहेत. त्यांचे नाव बदलून दयायला लागेल, वर्ष बदलून द्यायला लागेल. तुमच्याकडे सर्व काही आलेले आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही सगळे डॉक्युमेंट दाखवलेले आहेत. तुम्ही सांगून काहीही उपयोग नाही. जर त्या झोपडयांना टॅक्स लागला तरच ते रेकॉर्ड लिगल आहेत असे म्हणता येईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, तुम्हाला ह्याच्यावर निर्णय घ्यावा लागेल. दुसरा मुद्दा असा आहे की जुनी बिल्डींग सर्टिफिकेट बदलली म्हणजे हे काय चाललेले आहे? तीसुद्धा सभागृहाची माणसे आहेत. मी त्यांना जाब विचारेन. तुम्ही १०० टक्के सर्टिफिकेट दिलेले आहे की नाही ते वाचा.

**रतन पाटील :-**

तुम्ही आजच्या पेपरमधील बातमी वाचा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्या अनिता पाटील, नगरसेविका ह्यांचे जे लिव्हिंग सर्टिफिकेट आहे. त्याच्यावर दुसरा कागद चिकटून ते बदलून तिसऱ्याच्या नावाने त्याचा उपयोग केलेला आहे. त्याचा पाणी कनेक्शन टॅक्ससाठी उपयोग केलेला आहे. त्याचा जूना दाखला दाखवण्यासाठी उपयोग केलेला आहे. श्री. चंद्रकांत मोदीने पाण्याच्या कनेक्शनसाठी अटेस्टेड केलेले आहे. त्याचा किती रो आहे? ते मला माहिती नाही. परंतु, जुना दाखला दाखवण्यासाठी त्याच्यामध्ये चिठ्ठी लावून चिकटवलेले आहे. आपल्याकडे हे पेपर्स सादर केलेले आहेत. आपल्याकडे सादर करुन मा. आयुक्तसाहेबांना सादर केले. कालचा दै. नवशक्ती पेपर वाचा. त्याच्यामध्ये डिटेल आलेले आहे. इथे कोणीतरी बोलले की पेपरच्या बातमीवर विश्वास ठेवायचा का? तो प्रश्न नाही.

**मा. सभापती सो. :-**

आपल्याला पेपरवर चर्चा करायची नाही असे मी आधीच सांगितलेले आहे.

**रतन पाटील :-**

आज ही वस्तूस्थिती आलेली आहे. आपण हे प्रकरण काढले ते असेच येत राहिल. मग ते चालेल का?

**मा. आयुक्त सो. :-**

तुम्ही जो प्रस्ताव सादर केलेला आहे. तो कोणी सादर केलेला आहे? कधी सादर केलेला आहे?

**रतन पाटील :-**

माहितीच्या आधाराखाली श्री. बळवंत पाटील यांनी प्रस्ताव सादर केलेला होता. कालच्या दै. नवशक्तीला आलेला आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

मी सन्मा. सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की मला काल संध्याकाळी ४.३० वा. जी माहिती मिळालेली आहे. मी तुम्हाला त्या संदर्भात सांगू इच्छितो की कुठले तरी एका पाण्याच्या कनेक्शन मॅटर आहे.

**जयंत पाटील :-**

रामदेव पार्क असे त्याचे नाव आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

रामदेव पार्कमधील आकाशनिधी इमारतीच्या पाच कनेक्शनची तक्रार माझ्याकडे आलेली आहे. माझ्याकडे काल सहारा टी.व्ही.वाले आलेले होते. तेव्हा त्यांनी मला सांगितले की श्री. बळवंत पाटील नावाच्या शिवसेनेच्या नेत्यांनी माहितीच्या अधिकारात जी माहिती महापालिकेकडून प्राप्त करुन घेतलेली आहे. तुम्हाला त्या संदर्भात काही माहिती आहे का? मी त्यांना सांगितले की मला त्याबाबत काहीही माहिती नाही. मग त्यांनी मला असे विचारले की जी पाच अनधिकृत कनेक्शन दिली गेली. मी त्यांना असे सांगितले की जर तुम्ही अशा प्रकारे सांगितले ते मला आता सांगत आहेत मी त्याप्रमाणे संपूर्ण चौकशी करतो आणि मी तुम्हाला तुमच्या माहितीसाठी असे सांगतो की काल संध्याकाळी पाणीपुरवठा विभागातून पाच फाईली माझ्या कस्टडीमध्ये काल रात्री घेतलेल्या होत्या. आपली स्थायी समितीची सभा असल्यामुळे मी त्या फाईली माझ्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या आहेत. मी त्या फाईली बघितलेल्या नाहीत. आज आपली स्थायी समितीची सभा संपल्यानंतर मी त्याची पाहणी करणार आहे. परंतु, ही गोष्ट काल संध्याकाळी ४.३० वा. माझ्या निदर्शनास आलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही जे बोलतो आम्ही त्याच्यामध्ये कुठेही मागेपुढे बघत नाही. जे शहराच्या दृष्टीने विकासाचे आहे किंवा नियमात आहे. ते आम्ही बोलण्याचा प्रयत्न करतो. आता दुसरा विषय श्री. अजित पाटील यांचा घेऊया. श्री. अजित पाटीलसाहेब, तुम्हाला माहिती आहे की सेक्टर नं. ४ मध्ये रस्त्यामध्ये बांधकाम झालेले आहे. मा. उपमहापौर, श्री. चंद्रकांत वैती यांनी मला सांगितले की ते जे बांधकाम आहे. त्यांना कुठेही टॉवर बांधायला

द्या. तुम्ही अन्य ठिकाणी कुठेही द्या. काहीही करा. पक्षाच्या माध्यमातून करा, व्यक्तिगत उपमहापौर म्हणून करा. माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही. परंतु, जे रस्त्यामध्ये आहे ते रस्त्यामधून निघाले पाहिजे. ते मा. उपमहापौरांचे शब्द आहेत की मा. आयुक्तांचे शब्द आहेत की मा. सभापतींचे शब्द आहेत की मा. महापौरांचे शब्द आहेत ही चर्चा कशी होते? जे खरे आहे ते खरे आहे. आम्हाला त्याचा स्वाभिमान आहे.

**रमेश जैन :-**

श्री. खानसाहब, वह स्ट्रक्चर बीस सालका है। आजका नही है।

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तसाहब इसके बारेंमे निर्णय देंगे।

**रमेश जैन :-**

मा. आयुक्तसाहब क्या निर्णय देंगे?

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्तसाहब क्या निर्णय देंगे? वह हम लोग देखेंगे। जे काही मनात वाटेल ते बोलायचे का?

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की आपल्या मिटींगमध्ये बऱ्याच वेळेला अनधिकृत बांधकामाबाबत चर्चा होते.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही इतिवृत्तांतामध्ये बोललो होतो की सेक्टर नं. ४ मध्ये रस्त्यामध्ये शेड आहे. ती शेड काढायला पाहिजे. नाहीतर रस्ता काढायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

ती शेड रस्त्यामध्ये नाही.

**रोहिदास पाटील :-**

चार मजल्याची बिल्डिंग होते. जो पत्रे की शेड है। हमारा उसके बारेंमे प्रस्ताव है। हम लोगोने मा. आयुक्तसाहबसे चर्चा की है।

**एस. ए. खान :-**

वह आजका शेड नही है। जूना शेड है।

**शशिकांत भोईर :-**

बऱ्याच वेळेला अनधिकृत बांधकामाबाबत चर्चा होते आणि आता चर्चा सुरू आहे. परंतु, इतिवृत्तांत मंजूर झालेले नाही. माझी आपणास आणि या सभागृहास अशी विनंती आहे की जोपर्यंत अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण तुटत नाही तोपर्यंत ही सभा तहकूब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**जयंत पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब मा. महापौरांकडे ५ तारखेला जी मिटींग झालेली होती. माझे त्याच्यामध्ये एक पत्र आहे. तो विषय सर्व्हिस रोडबाबतचा होता.

**रोहिदास पाटील :-**

आता स्थायी समितीची सभा झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपली सर्व्हिस रोड बनवण्याबाबत मिटींग झालेली होती.

**रोहिदास पाटील :-**

नियमानुसार इथे सभा लागली याच्यामध्ये तो विषय येतो, नंतर मा. महापौरांचे पत्र येते. आम्ही कुठे जायचे? ते सांगा. आम्ही सगळ्यांना मान देतो. मा. सभापतींना मान देतो. मा. उपसभापतींना मान देतो. महापौरांना मान देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, या ठिकाणी सगळ्यांची पत्रे आहेत. आमचे पत्र का आलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

काशिमिरा रोडला छत्रपती शिवाजी महाराज मार्गाच्या बाजूला सर्व्हिस रोड आहे. त्याच्यामध्ये जी अनधिकृत बांधकामे चालू झालेली आहेत किंवा पूर्ण झालेली आहेत. त्याच्या निर्णयाबाबतचे हे पत्र आहे.

**जयंत पाटील :-**

शिवाय, आपल्या बाजूनी एकही निर्णय लागत नाही.

**मा. सभापती सो. :-**

मी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी तहकूबीची सुचना मागे घेण्याची विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

मी जी सभा तहकूब करण्याची सुचना मांडलेली होती ती मागे घेतो.

**मा. सभापती सो. :-**

आता सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

आपली इतिवृत्तांताच्या दुरुस्तीची चर्चा चालू होती.

**शशिकांत भोईर :-**

आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील सभागृहात उपस्थित नसल्यामुळे जे काही दुरुस्तीचे मुद्दे असतील ते दुरुस्ती करुन घेण्यात यावेत.

**नगरसचिव :-**

या इतिवृत्तांतामध्ये दुरुस्तीचे जे काही मुद्दे असतील ते दुरुस्त करुन घेण्यात यावेत अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**प्रकरण क्र. २०१ :-**

दि. ०८/११/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २०० :-**

दि. ०८/११/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०२ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या ठरावामध्ये संगणकाच्या पदांसाठी सन्मा. सदस्य जयंत पाटील किंवा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी घेतलेल्या उमेदवारांची नावे आलेली नाहीत. त्यामुळे थोडे कन्फ्युजन निर्माण झालेले आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

ह्यांच्या नावांची प्रिंट काढली असेल ना.

**जेन्वी अल्मेडा :-**

कदाचित ती नावे आली असतील.

**शशिकांत भोईर :-**

माझी माणसे घेतलेली नाहीत असा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी मुद्दा मांडलेला आहे. श्री. जयंत पाटीलसुद्धा तेच बोलत होते. काही लोकांची नावे घेण्यामध्ये काहीतरी अडचण आलेली आहे. मध्यंतरी सन्मा. सदस्य तूळशीदास म्हात्रेसुद्धा तेच बोलत होते. त्यामुळे तुम्ही संबंधित नगरसेवकांना विश्वासात घ्या. आम्ही नसताना त्यांनी ठरावाला मंजूरी कशी दिली? अशाप्रकारचा आमच्या नगरसेवकांमध्ये क्लेश निर्माण होऊ नये म्हणून तुम्ही संबंधित नगरसेवकांना विश्वासात घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुमच्या यादीला मंजूरी दिलेली आहे. परंतु, तुम्ही फक्त यादी चेक करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

कारण सन्मा. सदस्य जयंत पाटील, सन्मा. सदस्या तूळशीदास म्हात्रे आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या प्रश्नाबाबत विचार करावा अशी माझी विनंती आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण आता जी लिस्ट केलेली आहे. त्याच्यामध्ये बदल करता येणार नाही. कारण आपण ही लिस्ट पब्लिश केलेली आहे. समजा, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या उमेदवाराचे नांव आलेले नसले तरी आपण त्या उमेदवाराचे नाव ॲड करु शकतो. कारण या यादीमध्ये त्या उमेदवाराचे नाव नसले तरी ही प्रतिक्षा यादी असल्यामुळे आपण त्या उमेदवाराचे नाव ॲड करु शकतो. कारण ह्या यादीमध्ये त्या उमेदवारांचे नाव नसेल आणि प्रतिक्षा यादीमध्येसुद्धा त्या उमेदवाराचे नांव नसेल तर आपण नांव ॲड करु शकतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपले असे ठरलेले होते की प्रत्येक नगरसेवकांनी लेटरहेडवर त्याच्या उमेदवाराच्या नांवाची नोंद करुन लेटर द्यायचे आहे आणि जर आता लिस्टमध्ये त्या उमेदवाराचे नांव नसेल तर तुम्हाला याबाबत शहानिशा करुन घ्यावा लागेल. त्या नगरसेवकाने मी माझ्या लेटरहेडवर अमूक व्यक्तीच्या नावाने शिफारस केलेली होती ते चेक करावे लागेल.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण ज्या-ज्या लोकांची लिस्ट काढलेली आहे. त्या प्रत्येकाने नगरसेवकांची वगैरे शिफारस घेतलेली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तरीसुद्धा तुम्ही श्री. रोहिदास पाटील व श्री. जयंत पाटील यांना समजावून सांगा.

**दिपक खांबित :-**

श्री. रोहिदास पाटील यांचे असे म्हणणे आहे की माझ्या ऑफिसमध्ये एका टायपिस्टने ते लेटर टाईप केले आणि त्यानी त्याच्यावर सही केलेली आहे. मी म्हटले की तुम्ही अधिकार दिले तरी तो सही मारणार नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

असे चालत नाही.

**दिपक खांबित :-**

परंतु, आता त्या उमेदवाराचे काम झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

श्री. तूळशीदास म्हात्रे यांच्या उमेदवाराचे काय झाले?

**दिपक खांबित :-**

श्री. तूळशीदास म्हात्रे यांनी फक्त उमेदवाराला चार-चार पत्रे दिलेली होती. मग, त्याच्यामधील एक पत्र आमच्याकडे आलेले होते.

**जेन्वी अल्मेडा :-**

त्याच्यापैकी एक पत्र तुमच्याकडे आलेले आहे ना.

**मा. आयुक्त सो. :-**

आम्ही कोणावरही अन्याय केलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या पत्राचे काय झाले?

**दिपक खांबित :-**

कोणाचे कोणतेही मॅटर पेन्डिंग ठेवलेले नाही. सर्व काही व्यवस्थित केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जे पन्नास लिपिक घेतलेले होते. परंतु, आपण त्याच्यापेक्षा जास्त लिपिक घेतलेले आहेत आणि ते बिन पगारी काम करित आहेत.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण ५० लिपिकांना मंजूरी दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, ५० लिपिकांना जास्त लिपिक घेतलेले आहेत.

**मा. आयुक्त सो. :-**

माझ्या माहितीसाठी ५० लिपिक मागितलेले होते तर ७० लिपिक घेतलेले आहेत. म्हणजेच ५० लिपिकांचा पगार ७० लिपिकांना दिला जातो. ह्याच्यामध्ये विचार करण्याची काहीही आवश्यकता नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, आपल्या महापालिकेत जास्त २० लोक बसतात.

**मा. आयुक्त सो. :-**

आपण त्यांना यायला बंदी करुया.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण १०० लिपिक घेतलेले होते. त्याच्यामध्ये ह्या लिपिकांना सामावून घेतलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, आपण अजूनपर्यंत १०० लिपिकांचा निर्णय घेतलेला नाही.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. २०१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

सदर ठराव प्रतिक्षा यादीसह मंजूर करण्यांत यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर ठरावामध्ये 'प्रतिक्षा यादीसह' असा उल्लेख केलेला आहे.

**प्रकरण क्र. २०२ :-**

लघुलेखक, संगणक चालक नेमणूकीस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. २०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लघुलेखक, संगणकचालक नेमणेस मा. महासभा दि.२०/६/२००६ ठराव क्र. २९ व मा. स्थायी समिती सभा दि.२२/१२/२००६ ठराव क्र.१५४ अन्वये मान्यता देण्यांत आली आहे.

शासनाकडील क्रमांक मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८ दि. ९/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये आऊटसोर्सिंग (Outsourcing) करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविले होते. सदर अर्जांची छाननी करुन दि.२२/०२/२००७ रोजी मुलाखती घेण्यांत आल्या आहेत. सदर मुलाखतीकरीता गठित केलेल्या निवडसमितीने खालील उमेदवारांची यादी तयार केलेली आहे.

**लघुलेखक (पदसंख्या : ०४)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | कु. सुजाता जयंत येलवे |
| २ | कु. स्वाती तांबे |
| ३ | कु. श्वेता चंदनशिवे |
| ४ | कु. रुपेश बाणे |

**संगणकचालक (पदसंख्या : ८७)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | कु. सपना जे. मर्वी |
| २ | कु. दिप्ती रा. चांदणे |
| ३ | सौ. प्रज्ञा प्र. जाधव |
| ४ | कु. निर्भय जगदिश पाटील |
| ५ | कु. सेंड्रीका जेम्स बगाजी |
| ६ | कु. मिनाक्षी किसन भोईर |
| ७ | कु. स्वाती घनश्याम पाटील |
| ८ | कु. आदेश यशवंत पाटील |
| ९ | कु. अनुराधा वि. साळूंखे पाटील |
| १० | कु. गुरुनाथ गो. मयेकर |
| ११ | सौ . अर्चना पंकज घरत |
| १२ | कु. निलेश चंद्रकांत शनगरपू |
| १३ | कु. प्राजक्ता संतोष चुरी |
| १४ | कु. सुरेखा सीताराम नाईक |
| १५ | कु. कुणाल शशिकांत गुडेकर |
| १६ | कु. अतुल चंद्रहास्य लाड |
| १७ | कु. माधुरी देवचंद चिटके |
| १८ | सौ. अस्मिता भु. जगताप |
| १९ | कु. हितेंद्र रघुनाथ भोईर |
| २० | श्री. किरण सुरेश जाधव |
| २१ | कु. कविता संभाजी गुरव |
| २२ | कु. रुपेश तुकाराम दहिवलकर |
| २३ | कु. राकेश रामदास खेडेकर |

| | |
|---|---|
| २४ | कु. वैशाली गायकवाड |
| २५ | कु. सुचिता परब |
| २६ | सौ. वैशाली भगवान कल्याणकर |
| २७ | कु. विकास अनिल परबत |
| २८ | सौ. कविता गणेश सुळे |
| २९ | कु. हर्षला अनंत पाटील |
| ३० | कु. भाग्यश्री रामचंद्र पाटील |
| ३१ | कु. महेश रामचंद्र पाटील |
| ३२ | कु. रंजना एडवर्ड कासुधर |
| ३३ | कु. सुहास सुरेश परब |
| ३४ | कु. दर्पण कमलाकर वझे |
| ३५ | कु. वैभव गाडे |
| ३६ | कु. मनिष ग. भोईर |
| ३७ | कु. निष्कलंका (निशा) इ. बगाजी |
| ३८ | कु. विरेंद्र यशवंत पाटील |
| ३९ | कु. भक्ती राजन अरवंदेकर |
| ४० | कु. मंजिरी पेंडसे |
| ४१ | कु. विक्रम उंडाळे |
| ४२ | सौ. शर्मिला शेलार |
| ४३ | कु. एरीका सिरील बोर्जीस |
| ४४ | कु. दिपमाला विनायक मोसेकर |
| ४५ | कु. अमोल जयंत पाटील |
| ४६ | कु. महेश उमाकांत पाटील |
| ४७ | कु. रियाज शेख |
| ४८ | श्री. दिनेश रघुनाथ चापके |
| ४९ | कु. लॉरेटा गऱ्या |
| ५० | कु. सनिल जिकमडे |
| ५१ | कु. मिना पोशापीर |
| ५२ | कु. पुरुषोत्तम पाटील |
| ५३ | कु. तुषार दि. जगदाळे |
| ५४ | कु. दिपिका मनोहर पाटील |
| ५५ | कु. शंकर ल. चौधरी |
| ५६ | कु. संतोष सुर्यकांत सावंत |
| ५७ | कु. दिलीप पुंडलिकराव बुरपल्ले |
| ५८ | कु. ऑफेलिया मुनिस |
| ५९ | सौ. रेश्मा म्हात्रे |
| ६० | कु. भावेश विश्वनाथ राणे |
| ६१ | कु. प्रमोद जाधव |
| ६२ | कु. मंगेश प्रकाश घरत |
| ६३ | कु. सुप्रिया चंद्रकांत पाटील |
| ६४ | कु. यास्मिन शेख |

| | |
|---|---|
| ६५ | कु. प्रमिला जगदिश बावडेकर |
| ६६ | कु. मेघा मारुती पाटील |
| ६७ | सौ. अनुष्का आनंद जोशी |
| ६८ | कु. प्रफुल्ल पाटील |
| ६९ | कु. राकेश पाटील |
| ७० | कु. सुशिल घरत |
| ७१ | कु. रसिका श्रीकांत मोरे |
| ७२ | कु. कौशिक घरत |
| ७३ | कु. जितेंद्र रणदिवे |
| ७४ | कु. महेश पवार |
| ७५ | कु. आशिष अजित पांगारकर |
| ७६ | कु. मनिषा रमेश पाटील |
| ७७ | कु. दर्शना सोपान मैड |
| ७८ | कु. मनिषा कडू |
| ७९ | कु. योगेश मोरे |
| ८० | कु. हितेश भोईर |
| ८१ | कु. प्रशांत कण्हेरकर |
| ८२ | कु. आयवन लानगी |
| ८३ | सौ. स्मिता निमजे |
| ८४ | कु. सुषमा बनसोडे |
| ८५ | कु. दुर्वांक म्हात्रे |
| ८६ | पिंकी जनार्दन घरत |
| ८७ | रामेश्वरी चिंतामण पाटील |

**प्रतिक्षा यादी**

| **अ.क्र.** | **कर्मचा-याचे नाव** |
|---|---|
| १ | श्री. राजेश सुधाकर मोरे |
| २ | कु. तारमळे उत्तम जानु |
| ३ | कु. राहूल प्रदिप पाटील |
| ४ | बिराजदार सुरेखा शेषेराव |
| ५ | कु. सुनिल सुभाष जाधव |
| ६ | प्रशांत जगदिश किणी |
| ७ | कु. मनिषा वि. सुर्वे |
| ८ | महाले मंजुषा मनोहर |
| ९ | म्हात्रे विजया हरिश्चंद्र |
| १० | कु. वैशाली जगदिश पाटील |
| ११ | पाटील धनश्री जगन्नाथ |
| १२ | किणी अभिजीत मनोहर |
| १३ | दिपा विठ्ठल मोहिते |

वरील प्रमाणे लघुलेखक व संगणकचालक यांना प्रति माह (२६ दिवसांकरीता अनुक्रमे रु.५०००/- व रु.३९००/- या मासिक मानधनावर पाच महिन्याच्या नेमणूकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार मा.स्थायी समिती सदर प्रस्तावास मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०३ चे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

आता किती संगणक पाहिजे आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता चार संगणक आणि नऊ प्रिन्टर पाहिजे आहेत.

**जेन्वी अल्मेडा :-**

नऊ प्रिन्टर कशाला पाहिजेत? संगणक चार आणि प्रिन्टर नऊ कसे? याचे जरा स्पष्टीकरण करा.

**मा. आयुक्त सो. :-**

आपल्याकडे प्रिन्टर्स कमी आहेत. त्यामुळे आपण जास्त प्रिन्टर्स घेतलेले आहेत.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. २०३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २०३ :-**

मंजुर दराने संगणक व प्रिंटर्स खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. २०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागाकरिता संगणक संच, प्रिंटर व इतर साहित्य खरेदी करणेकामी दि. ०७/११/२००६ रोजी दै. सामना व दै. सागर या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार एकुण चार निविदाधारकांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या होत्या. त्यानुसार सर्वात कमी दर असलेला निविदाधारक मे. धृव कॉम्प्युटर्स यांनी १४ संगणक संच व १४ प्रिंटर्स पुरवठा करणेसंबंधी त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००७ रोजी ठराव क्र. १६४ नुसार अवलोकनार्थ मंजुरी दिलेली आहे. तसेच इतर विभाग प्रमुखांनी मिळून ४ संगणक व ९ प्रिंटर्स मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदरचे संगणक व प्रिंटर्स खरेदीस ३,७४,८००/- खर्च अपेक्षित आहे तरी मे. धृव कॉम्प्युटर्स यांना त्यांचे मंजूर दराने ४ संगणक संच व ९ प्रिंटर्स पुरवठा करणेकामी व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०४ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सदर विषयाचा गोषवारा दिलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझी मा. सभापतीसाहेबांना विनंती आहे की सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी हा विषय आणलेला होता. त्यामुळे प्रशासनाने या विषयाचा गोषवारा दिला तर बरे होईल. तो रेल्वे ब्रीज बांधणे आवश्यक आहे. कारण जेव्हा नागरिक प्लॅटफॉर्मवरुन ब्रीज क्रॉस करुन पलिकडे जातात. त्यावेळेला त्या नागरिकांना टी.सी अडवतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) ला रेल्वे लाईनचे काम चालू आहे. रेल्वेचे लोक त्या ठिकाणी कंपाऊन्ड वॉल बांधत आहेत. त्यामुळे लोकांना यायला-जायला त्रास होत आहे. आपल्याकडे पश्चिमेकडून पूर्वेला जायला ब्रीज जवळ नाही. आपल्याकडे जो एक ब्रीज आहे. तो अतिशय लांब आहे. त्याच्यामुळे लोकांना यायला जायला त्रास होतो. जर आपण रेल्वेचा ब्रीज वापरला तर तिथे टी.सी पकडतात आणि रेल्वेचा ब्रीज वापरायला देत नाहीत. स्टेशन रोडपासून फाटकापर्यंत फक्त एकच ब्रीज आहे.

**शशिकांत भोईर :-**

तसे पाहिजे तर दोन ब्रीज आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, ऑफिशियली एकच ब्रीज आहे. आपल्या भाईंदर पूर्व आणि पश्चिमेला बालाजी नगर, नयानगर, मोदी पटेल जो एरिया आहे. त्या एरियामधील लोकांना भरपूर त्रास होतो. त्यामुळे मी तुम्हाला विनंती करतो की, प्रशांत हॉटेल, भाईंदर (पू.) ते बालाजी नगर, भाईंदर (पश्चिम) येथे रेल्वे लाईनवर फूट ओव्हर ब्रीज बांधण्यासंबंधीचे जे एस्टिमेट आहे आणि जी काही कार्यवाही आहे त्या कार्यवाहीस स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**शशिकांत भोईर :-**

या ठरावात माझे अनुमोदन आहे.

**दिपक खांबित :-**

आम्ही एस्टिमेंट करुन घेत नाही कारण ते रु. ५० लाखाचे एस्टिमेंट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपण सदर प्रस्तावाची मा. महासभेला शिफारस करुया. आपण त्यापूर्वी हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये पास करुन घेऊया आणि नंतर त्या प्रस्तावाची मा. महासभेला शिफारस करुया.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, मी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की केबिन रोडला जो पादचारी पूल आहे. तो पादचारी पुल रस्त्यामध्ये उतरत होता. आम्ही खारीगांवात जो शितला देवी मंदिर मार्ग आहे. आम्ही हा ब्रीज तिथे उतरवण्याबाबत प्रस्ताव केलेला होता. त्याचे एस्टिमेटसुद्धा तयार आहे. आपण त्या एस्टिमेटला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिलेली होती. आता फक्त ते टेन्डर काढले तर बरे होईल. कारण अजूनपर्यंत तो रस्ता अरुंद आहे. ती निविदा काढली तर बरे होईल म्हणून तुम्ही याच्यावर रुलिंग द्या.

**तूळशीदास म्हात्रे :-**

प्रशांत हॉटेलचा जो रस्ता आहे. आम्ही त्या रस्त्याची निविदा काढलेली आहे. तुम्ही त्याबाबत प्रशासनाकडे पत्रव्यवहार करा.

**मा. सभापती साो. :-**

संबंधित अधिकाऱ्याने याच्यावर खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

आता सन्मा. सदस्य तूळशीदास म्हात्रे जे काही बोलतात. आपण त्याचे इमिजिएटली एस्टिमेट काढलेले होते आणि आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसुद्धा घेतलेली होती. परंतु, आपण बजेटमध्ये टेन्डर काढलेले नव्हते. आता महासभेने टेन्डर मंजूर केल्यानंतर आपण टेन्डरला मंजूरी घेऊन काम सुरु करुया.

**मा. सभापती सो. :-**

आपण टेन्डर काढल्यानंतर लवकरात लवकर काम सुरु करुया.

**दिपक खांबित :-**

साहेब, बजेटला तरतुद नसल्यामुळे आरोग्याची कामे पूर्ण होणार नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

आपण बजेटला तरतुद केलेली आहे. आपण कल्व्हर्टच्या जोडीला असे लिहिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

जर महासभेने तरतुद केली असेल तर आपण कामाला सुरूवात करुया.

**शशिकांत भोईर :-**

स्थायी समितीने तरतुद केलेली आहे.

**मा. सभापती सो. :-**

स्थायी समितीने बजेटला मंजूरी दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

महासभेने मंजूरी दिलेली आहे का?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण केबीन नाक्याला जो पादचारी पूल बनवलेला आहे. तो पादचारी पूल रस्त्यामध्ये उतरतो. आपण खारीगांव साईडला उतरलो तर तो रस्ता अरुंद आहे.

**दिपक खांबित :-**

आपण श्री. मोहन पाटीलसाहेबांचे जे ऑफिस आहे. ते काढायचे आणि तिथे पुढे ब्रीज बनवायचा. आपण रोड क्रॉस करुन ब्रीज बनवायचा म्हणजे रस्ता मोठा होईल.

**शशिकांत भोईर :-**

तो रस्ता मोठा होईल. सध्या त्या रस्त्याचे एस्टिमेट तयार आहे.

**तूळशीदास म्हात्रे :-**

प्रशांत हॉटेलजवळ जागा कमी आहे. तो रेल्वेचा मोठा रस्ता आहे. एक गाडी गेली तर ट्रॅफिक जाम होते. त्यामुळे तो रस्ता रुंद करण्याचा ग्रामपंचायतीने निर्णय घेतलेला होता.

**दिपक खांबित :-**

साठ फूट रोडवर सोनल अपार्टमेंन्टपर्यंत सगळ्या बिल्डिंग आहेत. त्यामुळे नाला वगैरे बांधला किंवा फोर ट्रॅक केला तर कसे समजेल?

**शशिकांत भोईर :-**

रेल्वे प्रशासनाने नाला बांधून त्या नाल्यावर डबल जाळीचा स्लॅबसुध्दा टाकलेला आहे. त्यामुळे आपल्याला नाले साफसफाई करण्यासाठी मोठी अडचण येणार आहे. जर आपले प्रशासन पुढे काहीतरी कार्यवाही करित असेल तर तो प्रश्न सुटेल.

**मा. सभापती सो. :-**

आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत.

**तूळशीदास म्हात्रे :-**

श्री. दिपक खांबित, तुम्ही ठराव करुन घ्या की रेल्वेने आपले गटार आतमध्ये घेतलेले आहे. आपल्याला ते गटार साफ करायला अडचण होते म्हणून तुम्ही रेल्वेला पत्रव्यवहार करा आणि ते गटार आतमध्ये घ्या.

**दिपक खांबित :-**

आपण रेल्वेला पत्रव्यवहार केलेला आहे.

**मा. सभापती सो. :-**

आपण रेल्वेला तसा प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी त्याच्यावर कार्यवाही करतील. आता पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २०४ :-**

प्रशांत हॉटेल भाईंदर (पू.) ते बालाजी नगर भाईंदर (प.) येथे रेल्वे लाईनवर फुट ओव्हर ब्रिज बांधणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. २०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता भाईंदर (प) येथील बालाजी नगर, मोदी पटेल, विनायक नगर, नारायण नगर परिसरातील लोकांना भाईंदर पुर्वेस जाण्यासाठी रेल्वेने संरक्षक भिंत बांधल्यामुळे अडचणीचे होणार आहे. तसेच भाईंदर पूर्वेकडून पश्चिमेस येण्यास ही अडचणीचे होणार आहे. करिता भाईंदर पूर्वेकडून पश्चिमेकडे रेल्वे पादचारी पूल बांधण्याची आवश्यकता आहे. सध्या फक्त केबिन रोड नाका येथे एकच फुट ओव्हर ब्रिज उपलब्ध असल्याने नागरीकांना स्टेशन परिसरात पर्याय उपलब्ध नाही. स्टेशन नजीक रेल्वे ओलांडताना अपघाताचे प्रकार वाढलेले आहेत. सदर फुट ओव्हर ब्रीज बांधणे कामी अंदाजपत्रक तयार करून अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यास ही सभा शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०५ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की मला या विषयावर बोलायचे आहे. प्रकरण क्र. २०५ मध्ये एल.सी.डी. प्रोजेक्टर खरेदी करण्याबाबतचा विषय आलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला पहिल्या दिवशी जो एल.सी.डी. दाखवलेला होता. तो जुना होता. आपण तो एल.सी.डी. नंतर वापरलेला नव्हता. तो एल.सी.डी. कुठे आहे? तुम्ही ह्या एल.सी.डी. बाबत बोलत आहात. मग आम्ही एकच एल.सी.डी बघितलेला आहे. मग दुसरा एल.सी.डी. कुठे आहे?

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २०५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. २०४ :-**

महानगरपालिकेने दि. १४/१२/२००६ रोजी दै. वार्ताहर व दै. जनमत या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार एल. सी. डी. प्रोजेक्शन टेलिव्हिजन व एल. सी. डी. प्रोजेक्टर पुरवठा करणेकामी एकूण चार ठेकेदारांनी निविदा मुदतीत सादर केल्या आहेत. निविदेतील तुलनात्मक तक्ता पाहता मे. कॉम्प्यूटर करीअर क्लासेस यांचे निविदेतील दर सर्वांत कमी आहेत. सदर कामी रु. ४,७९,६००/- इतका खर्च होणार असून या खर्चास मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०६ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २०६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २०४ :-**

सन २००६-०७ य वर्षातील पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनवणे कामाच्या निविदा महानगरपालिकेने मागवल्या होत्या. त्यास प्रतिसाद मिळून तीन निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या.

१) मे. रोहन एनव्हायरो असोसिएट्स
२) मे. वसंत पाटील ॲन्ड कंपनी
३) मे. एनव्हायरो एनलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि.

वरीलप्रमाणे निविदाकारांनी सादर केलेले निविदेतील दर खालीलप्रमाणे आहेत.

| | **निविदाकाराचे नाव** | **निविदेतील सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १) | मे. रोहन एनव्हायरो असोसिएट्स | रू. ११,७६,३९०/- |
| २) | मे. वसंत पाटील ॲन्ड कंपनी | रू. १३,७५,७१६/- |
| ३) | मे. एनव्हायरो एनलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि. | रू. १०,४१,७६०/- |

वरीलप्रमाणे तीनही निवीदाकारांनी निविदेत सादर केलेल्या दराची तुलना करता मे. एनव्हायरो एनलिस्ट यांनी सादर केलेले दर तीनही निविदाकारांच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे रू. १०,४१,७६०/- आहेत.

मे. एनव्हायरो एनलिस्ट यांनी सादर केलेल्या निविदेतील दराबाबत मा. आयुक्त यांनी यांचे दालनात वाटाघाटी करणेकरिता बोलवले होते. त्यानुसार त्यांनी निविदेतील बाब क्र. ३, बाब क्र. ५ व बाब क्र. ६ मधील सादर केलेल्या वार्षिक दरामध्ये रू. १,०७,६२०/- कमी केले.

मे. एनव्हायरो एनलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि. यांनी रू. ९,३४,१४०/- या वार्षिक खर्चात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण सद्यस्थिती अहवाल बनवणेस लेखी तयारी दर्शविली आहे. मे. एनव्हायरो एनलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि. यंनी वाटाघाटी नंतर सादर केलेल्या दरास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

मा. स्थायी समितीने प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०७ चे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

ह्याच्यामध्ये जे रेट लावलेले आहेत ते तीनपट आहेत ना. आम्ही मागच्या चर्चेमध्ये व्यवस्थित रेट घेऊन या असे सांगितलेले होते. परंतु, अजूनपर्यंत व्यवस्थित रेट आणत नाहीत. म्हणजे रु. १५/- च्या वस्तूला रु. ५०/- द्यायचे असा तुमचा कारभार आहे का? जर तुम्हाला असे मंजूर करायचे असेल तर करा. तुम्ही ह्याच्यासाठी एक कमिटी बनावा. म्हणजे ती कमिटी या सर्व गोष्टींबाबत चौकशी करेल.

**रुंदन राठोड :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की हे रेट बाजार भावापेक्षा रु. १० लाखावर रु. १ लाख ९४ हजारने कमी आहेत. जर कोणी तीन पट म्हणत असेल तर आपण ती सर्व मेडिसीन ह्याच्यापेक्षा तीनपट खरेदी करुन घेऊया. ह्या व्यतिरिक्त ह्या विषयाबाबत दुसरी काहीही बाब नाही.

**एस. ए. खान :-**

तुम्ही याची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमा. ह्या मेडिसीनचे रेट जास्त आहेत की कमी आहेत त्याची चौकशी समिती करेल. आम्ही मागच्या वेळेला मेडिसीनचे रेट जास्त आहेत म्हणून चर्चा केलेली होती.

**रुंदन राठोड :-**

पूर्वी जे मेडिसीन खरेदी केलेले होते. त्याच्यापेक्षा यांचा रेट कमी आहे. सन २००३-०४-०५ मध्ये जे मेडिसीन खरेदी केलेले होते. त्याच्यापेक्षासुद्धा हे रेट कमी आहेत.

**एस. ए. खान :-**

परंतु, आम्हाला हे रेट मान्य नाहीत. कारण हे रेट तीनपट जास्त आहेत.

**मा. आयुक्त साो. :-**

तुम्ही हे रेट मान्य नाहीत असे म्हणता. तुम्हाला हे कुठल्या गोष्टीसाठी मान्य नाहीत. तुम्ही म्हणता की हे रेट तीनपट जास्त आहेत तर आपण जे काही मेडिसीन खरेदी केलेले आहे. तुम्ही कोणत्या मेडिकल स्टोअरमध्ये जाऊन या मेडिसीनच्या रेटची चौकशी करु शकता.

**एस. ए. खान :-**

आम्ही मागच्या वेळेला बिलाच्या स्लिप वगैरे मेडिकलला दाखवलेल्या होत्या.

**मा. आयुक्त साो. :-**

मागच्या वेळेला जी चर्चा झालेली होती. मी त्या चर्चेवरुन बाजार भावाशी तुलना करायला सांगितलेले होते आणि बाजारभावाशी तुलना करुन अमाऊन्ट कमी केलेली आहे.

**मा. सभापती साो. :-**

आपण रु. १ लाख कमी केले ना.

**एस. ए. खान :-**

आपण बाजारभावाच्या तुलनेप्रमाणे रु. १ लाख ९४ हजार कमी केलेले आहेत.

**मा. आयुक्त साो. :-**

आमच्याकडे ही जी औषधे आहेत. मी तुम्हाला त्या औषधांची लिस्ट देतो. तुम्ही मंजूरी देत असाल तर आम्ही मंजूर करुन घेतो.

**एस. ए. खान :-**

तुम्ही तोपर्यंत हा विषय पेन्डिंग ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तोपर्यंत तुम्ही हा विषय पेन्डिंग ठेवा.

**एस. ए. खान :-**

तुम्ही आम्हाला लिस्ट द्या. आम्ही चौकशी करतो.

**रुंदन राठोड :-**

मा. आयुक्तसाहेबांनी फाईल परत पाठवलेली होती. आम्ही नंतर त्याची बाजारभावाशी तुलना करुन त्याचे रेट दिलेले आहेत. ते रेट रु. १ लाख ९४ हजार कमी आहे.

**एस. ए. खान :-**

तुम्ही आम्हाला मेडिसीनच्या रेटची लिस्ट द्या. आम्ही त्याचे रेट चेक करतो आणि आता जेवढे कमी रेट आलेले आहेत. कदाचित त्याच्यापेक्षा रेट कमी होतील. तुम्ही आहाला लिस्ट दया विषय संपला.

**ध्रुवकिशोर पाटील :-,**

आपल्या समितीचे सन्मा. सदस्य डॉ. रमेश जैन यांनी मला मुद्दाम फोन केलेला होता. ते बोलले की मी राजस्थानला जात आहे. त्यामुळे मी इकडे नाही. माझा फक्त मेडिसीनचा एकच विषय आहे. तो विषय तुम्ही घ्या. मी तुम्हाला अशी विनंती करतो की, तुम्ही मेडिसीनचा विषय पेन्डिंग ठेवा आणि तुम्ही या विषयावर खात्री करुन घ्या.

**मा. आयुक्त सो. :-**

पूर्वी प्रत्येक स्थायी समितीमध्ये अशा प्रकारचे गोषवारे मंजूर करुन घ्यायचे त्याच्याऐवजी वार्षिक निविदा मंजूर करुन घ्या आणि त्या वार्षिक निविदेप्रमाणे मेडिसीन खरेदी करुन घ्या अशी मी संबंधित अधिका-यांना सुचना करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही आपल्या महापालिकेतील औषधांचा तीन वर्षाचा रेकॉर्ड तपासला तर तुम्हाला ह्या मेडिसीनचा भाव जास्त आहे की कमी आहे ते माहिती पडेल. कारण आपल्या पालिकेमध्येसुद्धा असा रेकॉर्ड आहे.

**रुंदन राठोड :-**

माझ्याकडे मेडिसीनचे रेट आहेत. हे रेट सन २००४-०५, २००५-०६ पेक्षासुद्धा कमी आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही हा विषय पेन्डिंग ठेवा आणि मंजूरी मिळाल्यानंतर कार्यवाही करा.

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय पेन्डिंग ठेवण्यात येत आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

सदर विषय पेन्डिंग ठेवूया.

**प्रकरण क्र. २०७ :-**

**मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)**

**ठराव क्र. १७२:-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सदरचा विषय मा. सभापती यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)
(नगरसचिवांनी प्रकरण क्र. २०८ चे वाचन केले.)

**मा. सभापती सो. :-**

सदर विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २०८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. २०६ :-**

**विषय क्र. १ :- महानगरपालिका मा. महापौर, मा. उप-महापौर, सर्व सादस्य/ सदस्या यांचे करीता लेटरपॅड, व्हिझीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि. २५-११-२००६ रोजी दै "आपला वार्ताहर" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मा. महापौर, मा. उप-महापौर, सर्व सदस्य/सदस्या यांचेकरिता लेटरपॅड, व्हिझीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करण्याकामी खालील ठेकेदारांनी आपली निविदा मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. चंडिका प्रिटर्स | मे. पद्मावती पेपर्स | मे. गिरीष प्रिंटरी |
|---|---|---|---|---|
| १ | लेटरपॅड-स्पेशल एक्झिक्युटीव्ह बॉन्ड पेपर सा. १/४, स्क्रिन प्रिंटीग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १७०० प्र.पाचशे<br>२७०० प्र.हजारी | १६३० प्र.पाचशे<br>२५७५ प्र.हजारी | १६०० प्र.पाचशे<br>२५५० प्र.हजारी |
| २ | लेटरपॅड-स्पेशल एक्झिक्युटीव्ह बॉन्ड पेपर सा. १/८, स्क्रिन प्रिटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १६१० प्र.पाचशे<br>२४१० प्र.हजारी | १४९० प्र.पाचशे<br>२३१० प्र.हजारी | १४५० प्र.पाचशे<br>२२०० प्र.हजारी |
| ३ | व्हिझिटिंग कार्ड-अमेरिकन साईज स्क्रीन प्रिटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १६२५ प्र.पाचशे<br>२१०० प्र.हजारी | १५२५ प्र.पाचशे<br>२०३० प्र.हजारी | १४५० प्र.पाचशे<br>१९२५ प्र.हजारी |
| ४ | इनव्हलप-सुपर फाईन सा. ७''x ४'' स्क्रीन प्रिटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १६३० प्र.पाचशे<br>२२१५ प्र.हजारी | १५३५ प्र.पाचशे<br>२१२५ प्र.हजारी | १४२५ प्र.पाचशे<br>२०५० प्र.हजारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | इनव्हलप- सुपर फाईन सा. ९'' x ४'' स्क्रीन प्रिंटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १९१० प्र.पाचशे २७२५ प्र.हजारी | १८०० प्र.पाचशे २६१५ प्र.हजारी | १७२० प्र.पाचशे २५१० प्र.हजारी |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. गिरीष प्रिंटरी यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सदर निविदेतील दराबाबत वाटाघाटी करुन संबंधित ठेकेदाराकडुन खालीलप्रमाणे दर कमी करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. गिरीष प्रिंटरी | |
|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटीअंती दर |
| १ | लेटरपॅड-स्पेशल एक्झिक्युटीव्ह बॉन्ड पेपर सा. १/४, स्क्रिन प्रिंटीग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १६०० प्र.पाचशे २५५० प्र.हजारी | १५०० प्र.पाचशे २४५० प्र.हजारी |
| २ | लेटरपॅड-स्पेशल एक्झिक्युटीव्ह बॉन्ड पेपर सा. १/८, स्क्रिन प्रिंटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १४५० प्र.पाचशे २२०० प्र.हजारी | १३५० प्र.पाचशे २१०० प्र.हजारी |
| ३ | व्हिझिटिंग कार्ड-अमेरिकन साईज स्क्रीन प्रिंटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १४५० प्र.पाचशे १९२५ प्र.हजारी | १३५० प्र.पाचशे १८२५ प्र.हजारी |
| ४ | इनव्हलप-सुपर फाईन सा. ७''x ४'' स्क्रीन प्रिंटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १४२५ प्र.पाचशे २०५० प्र.हजारी | १३२५ प्र.पाचशे १९५० प्र.हजारी |
| ५ | इनव्हलप- सुपर फाईन सा. ९'' x ४'' स्क्रीन प्रिंटींग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १७२० प्र.पाचशे २५१० प्र.हजारी | १६२० प्र.पाचशे २४१० प्र.हजारी |

तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असुन सदर प्रकरणी मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**विषय क्र. २ :- महानगरपालिकेस चलनी नोटा मोजणे मशिन खेरदी करणे.**

महानगरपालिकेने दि. २२/१२/०६ रोजी "दै. मुंबई लक्षदिप" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदे सुचनेनुसार महानगरपालिकेस नोटा मोजण्याची मशीन (कॅश काऊन्टींग) खरेदी करण्याकामी खालील संबंधित ठेकेदारांनी आपली निविदा मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. केंटल कार्पोरेशन | मे. एस.एस. इन्टरप्राईजेस | मे. कायनेटिक इन्टरप्राईजेस |
|---|---|---|---|---|
| १ | नोटा मोजण्याचे टेबल टॉप मशीन (कॅश काऊन्टींग) खरेदी करणे (लुज व बंडल) | रु. ६७,५००/- प्र. नग | रु. ६५,०००/- प्र. नग | रु. ५०,५९६/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. कायनेटिक इन्टरप्राईजेस यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असुन सदर प्रकरणी मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**विषय क्र. ३ :- महानगरपालिकेस डोअर मेटल डिटेक्टर व हॅण्ड मेटल डिटेक्टर खरेदी करणे.**

महानगरपालिकेने दि. १५/१२/२००६ रोजी दै. सन्मित्र व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदेसुचनेनुसार डोअर मेटल डिटेक्टर व हॅण्ड मेटल डिटेक्टर खरेदी करण्याकामी खालील ठेकेदाराने आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. वाय.एम. ट्रेडिंग कंपनी | मे. एस.एस. इन्टरप्राईजेस | मे. इंडयुस इंजिनिअरर्स |
|---|---|---|---|---|
| १) | डोअर मेटल डिटेक्टर | रु. ६२,५००/- प्र. नग | **रु. ५२,५००/- प्र. नग** | रु. ५८,५००/- प्र. नग |
| २) | हॅण्ड मेटल डिटेक्टर | रु. ४,२५०/- प्र. नग | **रु. ३,९००/- प्र. नग** | रु. ४,२००/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. एस.एस. इन्टरप्राईजेस यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वांत कमी आहे. तरी सर्वात कमी दराच्या निविदा मा. आयुक्त साो. यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. सदर काम नियमानुसार असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम खंड ७ (ड) अन्वये अवलोकन करण्यात आलेले आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती साो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्या मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याचे वेळ :- दुपारी ३ वा. १५ मि.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**